पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५८ ● गुरूवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"यशस्वी होण्यासाठी गतीपेक्षा दिशा महत्त्वाची असते.




## आर आर सी चा महाधमाका ! पुरवठा विभाग संशयाच्या भोवऱ्यात !

# बेकायदेशीर धान्य गोदाम अन् इथेनॉल भेसळ रॅकेट उघडे!

## 'ये क्या है?' म्हणत स्वतःच्याच व्हिडिओने उघड केले गोदामातील धान्य

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

अकोला : जिल्हा पुरवठा विभागाचा ढिसाळ कारभार अन् अधिकाऱ्यांचे संशयास्पद मौन अखेर चव्हाट्यावर आले आहे. 'आर आर सी'ने लावून धरलेल्या बातमीनंतर पुरवठा विभागाने गुलजार पुऱ्यातील बेकायदेशीर धान्य साठवणूक गोदामावर धाड टाकली खरी, पण या संपूर्ण कारवाईने पुरवठा अधिकाऱ्यांचीच झोप उडवली आहे.

कारवाई दरम्यान पुरवठा विभागाच्या व अधिकाऱ्यांच्या कॅमेऱ्यात कैद झालेला 'ये क्या है?' हा उद्गारच आता पुरवठा विभागाच्या नाकर्तेपणाची आणि भ्रष्ट कारभाराची लक्तरे वेशीवर टांगणारा ठरला आहे. गुलजार पुऱ्यातील गोदाम धान्यसाठा नसल्याची मुलाखत देणारे जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार यांच्या कॅमेरामनने केलेल्या शुटिंग मध्ये गोदामात धान्यसाठ्याच्या पाऊलखुणा दिसल्यात. गुलजारपुऱ्यात तांदळाचा अवैध साठा असल्याचे वृत्त आर आर सी न्यूज ने लावले होते. त्यानंतर ही धाड टाकल्या गेली होती. पण, या धाडीत काहीच आढळले नाही असा दावा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार यांनी केला आहे. एक्साईज डिपार्टमेंटने टाकलेल्या धाडीत घुसर येथे इथेनॉल मिळाले पण, पुरवठा विभागाला काहीच कसे मिळत नाही अशी चर्चा रंगली आहे. पुरवठा विभागाच्या या संशयास्पद भूमिकेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी महोदयांनी पुरवठा विभागाचा अहवाल, त्या दिवशीची व्हिडिओग्राफी आणि जिल्ह्यातील सर्व गोदामांची स्वतः झाडाझडती घ्यावी. तसेच, निष्क्रिय ठरलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून दूध का दूध आणि पाणी का पाणी करावे, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.



### इथेनॉल रॅकेटवर पुरवठा विभाग सुस्त

फक्त सरकारी धान्य साठेबाजीच नाही, तर जिल्ह्यात पेट्रोलमध्ये प्रमाणाबाहेर इथेनॉल मिसळण्याचे मोठे रॅकेट फोफावले आहे. घुसर येथे अवैध इथेनॉलच्या साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने (एक्साईज) थेट धाड टाकून कारवाई केली, मात्र पुरवठा विभागाला याची भणकही लागू नये, यावरून अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाची परिसीमा उघडी पडली आहे. पेट्रोल पंपांवर ग्राहकांची उघडपणे होणारी फसवणूक आणि इथेनॉल भेसळीकडे पुरवठा अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा गंभीर आरोप होत आहे.




### 'आर आर सी'च्या दणक्यानंतरच जाग का आली?

गुलजार पुऱ्यातील गोदामात सरकारी अन्नधान्याचा बेकायदेशीर साठा केल्याची बातमी प्रसारीत होताच प्रशासनात खळबळ उडाली आहे. मात्र, 'आर आर सी'ने बातमी प्रसिद्ध करेपर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी येन्नावार आणि त्यांचे पथक गाढ झोपेत होते का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. बातमी येताच घाईघाईने तपासणीचा बनाव रचला गेला, परंतु कारवाईदरम्यान बातमी उघड करणाऱ्या 'आर आर सी'च्या प्रतिनिधींना सोबत का ठेवले गेले नाही? या गोपनीयतेमागे काय गौडबंगाल आहे, असा थेट संशय आता उपस्थित केला जात आहे.

## »थोडक्यात

### मटणाच्या भाजीसाठी मोठ्याने लहान भावाला संपवले!

चंद्रपूर : चंद्रपूरच्या चिमूर तालुक्यातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. मटणाच्या भाजीवरून झालेल्या वादात मोठ्या भावाने लहान भावावर कुऱ्हाडीने घाव घालत खून केल्याची घटना शंकरपूर येथे २ सप्टेंबरला संध्याकाळच्या घडली. रक्षाबंधनानिमित्त बहिणीला दिलेल्या पाहुणचाराच्या मटणाच्या भाजीवरून उफाळलेला किरकोळ वादातून ही घटना झाल्याची माहिती चंद्रपूर पोलिसांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश श्रीराम बनकर (५५) असे मृत भावाचे नाव असून हत्या करणारा मोठा भाऊ जगन श्रीराम बनकर (६०) याला भिसी पोलिसांनी अटक केली आहे.

### अंतरवालीत मराठा आंदोलकाचा दुर्दैवी अंत

जालना : मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी आलेल्या मराठा आंदोलकाचा अंतरवाली सराटीत मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दशरथ रायकर असं या मराठा आंदोलकाचं नाव असून ते बीड जिल्ह्यातील संगम येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. दशरथ रायकर हे मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी अंतरवाली सराटीत आले होते.

### सामाजिक कार्यकर्ते बापट यांच्यावर हल्ला

पुणे : पुण्यातील गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये होणाऱ्या ध्वनीप्रदूषणा विरोधात ठामपणे भूमिका घेणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर गुरुवारी पुण्यात हल्ला झाला. ते एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना त्यांच्यावर एका व्यक्तीने हल्ला केला. मात्र, त्याठिकाणी पोलीस आणि इतरजण उपस्थित असल्याने पुढील अनर्थ टळला. मात्र, या हल्ल्यानंतर विद्यानंद बापट जराही डगमगले नाहीत. त्यांनी या हल्ल्यानंतर प्रसारमाध्यमांना तितक्याच शांतपणे प्रतिक्रिया दिली. माझी भूमिका योग्य आहे, हे मला माहिती आहे. मग मी त्यावर ठाम राहणार, असे विद्यानंद बापट यांनी सांगितले.

# महावितरणमध्ये मोठी खळबळ हेमंत पावडे यांचे निलंबन !

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**अकोला** : महावितरणच्या कारभारात निष्काळजीपणा आणि कंत्राटदारांशी अवाजवी जवळीक बाळगणे अकोल्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याला चांगलेच भोवले आहे. अकोला परिमंडळातील महावितरणचे कार्यकारी अभियंता हेमंत पावडे यांच्यावर तडकाफडकी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या धडक कारवाईमुळे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

हेमंत पावडे यांच्याविरोधात प्रशासकीय स्तरावर विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. महावितरणच्या तिजोरीतील थकबाकी वसुलीकडे केलेले दुर्लक्ष, मेंटेनन्स (देखभाल व दुरुस्ती) कंत्राटदारांकडून दर्जेदार कामे करून न घेणे आणि कंत्राटदारांच्या फॉरच्युनर गाड्यांमधून प्रवास (वर्धावारी) करणे यांसारखे गंभीर ठपके त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत. मेंटेनन्स कंत्राटदारांच्या खासगी वाहनांचा वापर करून वर्धावारी करणे आणि त्यांच्या हितसंबंधांना खतपाणी घालणे पावडे यांना महागात पडले आहे. मेंटेनन्सच्या नावाखाली फक्त कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांचा दर्जा न राखल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. वीज बिलांची थकीत वसुली करण्यात आलेले अपयश आणि वरिष्ठांच्या आदेशांकडे केलेले दुर्लक्ष कारवाईसाठी कारणीभूत ठरले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालानंतर महावितरणच्या मुख्य व्यवस्थापनाने ही कारवाई केली आहे. निलंबनाच्या कालावधीत पावडे यांना मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली असून, पुढील चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे महावितरणमधील कंत्राटदार-अधिकारी साखळीचे धाबे दणाणले आहेत. दिनोरे यांच्याकडे पावडे यांचा चार्ज सोपविल्याची माहिती आहे.

# मनोज जरांगे पाटील मागण्यांवर ठाम!

## संभाजीनगरमध्ये विखे पाटलांच्या उपस्थितीत मंत्र्यांची बैठक सुरु

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**संभाजीनगर** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या सहा दिवसांपासून उपोषण सुरु आहे. अद्यापही तोडगा न निघल्याने जरांगे पाटील आपल्या उपोषणावर ठाम आहेत. सरकारकडून त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे. मात्र, मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. अशातच छत्रपती संभाजीनगरध्ये मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, मंत्री मकरंद पाटील यांच्यासह प्रसाद लाड यांच्यात बैठक सुरु आहे. यामध्ये आता नेमका काय निर्णय होणार, याकडे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत संभाजीनगरमध्ये पुन्हा एकदा मीटिंग सुरु झाली आहे, जरांगे यांना काल प्रसाद लाड यांनी मसुदा दिला होता आणि उपोषण सोडण्याची विनंती केली होती. मात्र जरांगे काही मागण्यांवर ठाम होते. त्यामुळं पुढील दिशा ठरवण्यासाठी मीटिंग सुरु झाली आहे. बैठकीत राधाकृष्ण विखे पाटील , उदय सामंत प्रसाद लाड, मकरंद आबा पाटील सह जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत. दरम्यान, आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषणावरुन उठणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. आमची रद्द झालेली प्रमाणपत्र द्यावीत अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच ज्यांची नोंदी सापडल्या आहेत, त्यांना देखील प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

### फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून मराठा आरक्षणाला गती - विखे पाटील

आम्ही खूप सकारात्मक आहोत कुणालाही फसवत नाही. आम्ही २ पाऊल पुढं येतोय आंदोलकांनीही यावे, आम्ही सुधारणेला तयार आहोत असे मत विखे पाटील यांनी व्यक्त केले. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही याची काळजी सरकारने घेतली आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून मराठा आरक्षणाला गती मिळाल्याचे विखे पाटील म्हणाले. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आम्ही सरकारचा मसूदा जरांगे पाटील यांना दिल्याचे विखे पाटील म्हणाले. सुधारणा करायच्या असतील तर सांगा समिती चर्चा करायला आम्ही तयार असल्याचे आहेत.

# मूळ दुखण्याकडे दुर्लक्षासाठीच इतर इश्यू : खा. शरद पवार!

## सरकारवर घणाघाती टीका : महागाई, शिक्षणातील घोळ हे सरकारच्याच सहमतीने

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**बारामती** : राज्यात महागाई वाढतानाचे चित्र आहे, आज राज्याची, देशाची अर्थव्यवस्था अडचणीत जाते, महागाई वाढत असल्याने दैनंदिन गरजांची पूर्तता करणेही कुटुंबप्रमुखांना अवघड जात आहे. या सर्व गोष्टीवरून दुसरीकडे लक्ष न्यायचं, त्यासाठी कळत नकळत सरकारच्या सहमतीने असे काही इशू घडत आहेत, शिक्षण असेल, लोकांनी ती चर्चा करत बसावी आणि मूळ दुखणे आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करावे, हे ठरवून होत आहे असे आम्हाला दिसतेय, असे म्हणत राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारच्या धोरणांचा खरपूस समाचार घेतला.

ते बारामतीतील माळेगाव येथे ३ सप्टेंबर रोजी माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. ते पुढे कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाबाबत बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांचे आंदोलन आहे, त्यांच्या काही मागण्या आहेत त्यासाठी सरकारने स्वीकारलेले धोरण हे कसे चुकीचे आहे हे न्याय व्यवस्थेने स्पष्ट सांगितले आहे. या व्यवस्थेने सरकारला एक प्रकारे कडक शब्दात सल्ला दिला आहे, तुम्ही या पद्धतीने निर्णय नाही घेतले तर आम्हाला काही निर्णय करावे लागतील. न्याय पद्धती ही शेवटी प्रशासकीय अधिकारी आपल्या हातात घेतात की काय याची चिंता वाटावी, अशी स्थिती आज या सरकारने आणली आहे.

जीडीपीबाबात बोलताना शरद पवार म्हणाले की, देशाचे अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री अर्थव्यवस्थेचे अतिशय सुंदर चित्र देशाचे आहे असे भासवण्याचा प्रयत्न करत आहेत. मूळ जे दुखणं आहे त्याकडे त्यांचे लक्ष नाही, आज त्यांचे लक्ष खाली आहे, त्यांची नोंद त्यांनी घेतली नाही असं दिसत आहे. लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी प्रधानमंत्री आंतरराष्ट्रीय पातळीवर काही गोष्टी बोलतायेत आणि इथली वस्तूस्थिती एका दृष्टीने बाजूला ठेवत आहेत.

पंतप्रधान मोदींच्या बारामती दौऱ्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, ते येतो म्हणले आहेत. आम्ही त्यांना १६ ऑक्टोबरची तारीख दिली आहे, पण ती पुढे मागे होण्याची शक्यता आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स याची इन्स्टिट्यूट इथे उभी केली आहे, ती देशातील पहिली आहे. त्याची ते पाहणी करतील त्याचं एक प्रेझेंटेशन त्यांना द्यायचं आहे. आमच्या काही लोकांनी सुप्रियाच्या मुलीच्या लग्नात त्याचं प्रेझेंटेशन त्यांना दिलं होतं. पण त्यांना हे सविस्तर समजून घ्यायचं आहे तो कार्यक्रम इथे आहे, अशी माहिती देखील शरद पवारांनी दिली आहे.



### साखरेची आयात करणे योग्य नाही!

साखरेच्या दराबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, याचा ऊस उत्पादकांना फायदा झाला आहे असं अजून तरी दिसत नाही. पण जो पिकवतो. वाढत्या दारातील काही हिस्सा हा त्याच्याकडे गेला पाहिजे, आजच्या स्थितीला असं काही दिसत नाही. तर साखर आयातीच्या परिणामाबाबत म्हणाले, माझ्या मते आयात करणे योग्य नाही. इम्पोर्टेड साखर येणार, कधी त्याचा फायदा काय होईल हे आज सांगता येत नाही.

### आठ-दहा दिवस वाट पाहू मगच चर्चा करू!

शिवसेना चिन्ह वाटप सुनावणीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, मी सांगू शकत नाही, काय होईल, शेवटी कोर्टाचा निकाल आहे, अजून सुनावण्या सुरू आहेत, संपलेल्या नाहीच, त्या आधी आपण भाष्य करायचं, तुम्ही त्याची नोंद घ्यायची, आठ-दहा दिवस वाट पाहू आणि मग चर्चा करू, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली आहे.



# महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी

## शेतकरी शरद जोशी यांची आज जयंती



शरद अनंतराव जोशी १२ डिसेंबर २०१५ हे एक भारतीय राजकारणी होते, ज्यांनी स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटना (शेतकरी संघटना) यांची स्थापना केली. ते ५ जुलै २००४ ते ४ जुलै २०१० पर्यंत भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे खासदार होते. ९ जानेवारी २०१० रोजी, भारतीय संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकाच्या विरोधात मतदान करणारे ते राज्यसभेतील एकमेव खासदार होते .

जोशी हे जागतिक कृषी मंचच्या सल्लागार मंडळाचे सदस्य होते , जे कृषी क्षेत्रावर प्रभाव टाकू शकणाऱ्यांमध्ये संवाद सुरू करणारे प्रमुख जागतिक कृषी व्यासपीठ आहे. शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांची एक गैर-राजकीय संघटना आहे, जी 'बाजारपेठा आणि तंत्रज्ञानामध्ये मुक्त प्रवेश' या उद्देशाने स्थापन झाली आहे. शरद जोशी यांचा जन्म ३ सप्टेंबर १९३५ रोजी भारतातील महाराष्ट्र राज्यातील सातारा येथे अनंत नारायण आणि इंदिराबाई जोशी यांच्या पोटी झाला. त्यांनी १९५७ मध्ये मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजमधून वाणिज्य शाखेत पदव्युत्तर पदवी आणि १९७४ मध्ये लॉझनमधून इन्फॉर्मेटिक्समध्ये डिप्लोमा मिळवला. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना बँकिंग क्षेत्रासाठी सी.ई. रँडल सुवर्णपदक आणि सिंचन लाभांच्या गणनेवरील कार्यासाठी करसेटजी डॅडी पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले. त्यांनी १९५७-५८ मध्ये पुणे विद्यापीठात अर्थशास्त्र आणि सांख्यिकीचे व्याख्याता म्हणून काम केले . नंतर त्यांनी १९५८-६८ मध्ये भारतीय टपाल सेवेत काम केले. त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १९६८ ते ७७ पर्यंत स्वित्झर्लंडमधील बर्न येथील युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या आंतरराष्ट्रीय ब्युरोमध्ये माहिती सेवा प्रमुख म्हणून दीर्घकाळ काम केले. शेतकरी संघटनेची स्थापना करण्यापूर्वी त्यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये अधिकारी म्हणून काम केले.

जोशी हे महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे संस्थापक होते. त्यांनी भारतात कृषी समस्यांवर अनेक जनआंदोलने केली. त्यापैकी बहुतेक आंदोलने महाराष्ट्रात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भावांच्या मुद्यांवर झाली. ते 'किसान समन्वय समिती'चे संस्थापक नेते देखील होते, ज्यात महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ या १४ राज्यांतील भगिनी संघटनांचा समावेश होता. किसान समन्वय समितीने महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब, हरियाणा आणि इतर राज्यांमध्ये कांदे, ऊस , तंबाखू , दूध , भात , कापूस यांना किफायतशीर भाव मिळावा, वीज दरवाढीविरोधात, ग्रामीण कर्जमुक्तीसाठी आणि देशांतर्गत बाजारपेठेत राज्यांकडून होणाऱ्या डंपिंगविरोधात अनेक आंदोलने केली. १९९५ मध्ये हिंगणघाट मतदारसंघातून झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा शिवसेनेचे अशोक शिंदे यांच्याकडून पराभव झाला.

जोशी हे एक आर्थिक उदारमतवादी होते. ज्यांनी कृषी क्षेत्रातील सरकारी नियंत्रण कमी करण्याची मागणी केली. त्यांनीं ऊध् चे समर्थन केले कारण त्यांचा विश्वास होता की भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळाल्यास त्यांना फायदा होऊ शकतो. शहरी उच्चभ्रूंकडून ग्रामीण शेतकऱ्यांकडे होणारे दुर्लक्ष अधोरेखित करण्यासाठी 'भारत विरुद्ध इंडिया' ही संज्ञा वापरण्याचे श्रेय जोशी यांना दिले जाते. त्यांच्या मृत्युपत्रात, जोशींनी त्यांच्या मालमत्तेचा बहुतेक भाग शेतकरी ट्रस्टला दिला, ज्यावर त्यांचे कार्य पुढे नेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ते उत्तम स्तंभलेखक होते तसेच त्यांनी कृषी समस्यांवर पुस्तकेही लिहिली होती.

### समाजवाद आणि भारतीय संविधान

डिसेंबर २००५ मध्ये शरद जोशी यांनी राज्यसभेत खासगी सदस्य विधेयक सादर करून, लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधून 'समाजवाद' हा शब्द वगळण्याची मागणी केली. हा कायदा स्वतः संविधान सभेनेच मंजूर केल्यामुळे, तो भारतीय संविधानाचा एक भाग मानला जातो. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी केलेल्या भारतीय संविधानाच्या बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीपूर्वी 'समाजवाद' हा शब्द भारतीय संविधानात अस्तित्वात नव्हता. या दुरुस्तीने संविधानाची प्रस्तावना बदलली आणि 'सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक'च्या जागी 'सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक' असे नामकरण केले.

### शेतकरी महिला आघाडी (एसएमए)

शरद जोशी हे ग्रामीण महिलांच्या सर्वात मोठ्या संघटनेचे, शेतकरी महिला आघाडीचे संस्थापक देखील होते, जी महिलांच्या मालमत्ता हक्कांसाठी केलेल्या कार्यासाठी ओळखली जाते, विशेषतः लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमासाठी ज्याने लाखो ग्रामीण गृहिणींना जमिनीचे हक्क प्रदान केले आहेत. १९८६ मध्ये, महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील चांदवड गावात दोन लाखांहून अधिक शेतकरी महिलांचा मेळावा झाला होता.

### शेतीसाठी विशेष आर्थिक क्षेत्रे

शरद जोशी यांनी भारताच्या तुलनात्मक फायद्याच्या क्षेत्रांमध्ये, विशेषतः सेंद्रिय शेती, सुगंधी आणि औषधी वनस्पती, संकरित बियाण्यांचे उत्पादन आणि फलोत्पादन यांमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रांचे समर्थन केले. जोशी यांनी सेंद्रिय शेती उत्पादनांसाठी विश्वासार्ह प्रमाणीकरण संस्था स्थापन करण्याच्या गरजेवरही भर दिला.

त्यांनी पाश्चात्य देशांमध्ये लोकप्रिय असलेल्या कांद्याच्या जाती पिकवण्यासाठी विशेष क्षेत्रांची सूचना केली, जेणेकरून देशांतर्गत बाजारपेठ आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपासून अलिप्त ठेवता येईल आणि परकीय चलनावर कोणताही नकारात्मक परिणाम न होता तुटवडा टाळता येईल.

९८६ साली, महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील चांदवड गावात दोन लाखांहून अधिक शेतकरी महिलांचा मेळावा भरला होता. या मेळाव्याच्या कित्येक आठवडे आधीपासूनच, एक शेतकरी महिला आपली अवजारे आणि बाळाला पाठीवर घेऊन जात असल्याचे दर्शवणारे पोस्टर्स लावण्यात आले होते. पोस्टरवरील मथळा स्वातंत्र्यकाळातील एका प्रभावी मराठी गाण्यातून घेतला होता, ज्यात विचारले होते, "मी अजून किती काळ मरत राहू?" आणि त्याचे उत्तर होते: " स्त्री शक्तीच्या जागृती स्त्री-पुरुष मुक्ति "... (जेव्हा स्त्रीशक्ती जागृत होते, तेव्हा स्त्री आणि पुरुष दोघेही मुक्त होतात). जमलेल्या लाखो लोकांसाठी ही जणू एक युद्धगर्जनाच होती आणि त्या जुन्या काळाची आठवण करून देणारी होती, जेव्हा चांदवडच्या एका राणीने पतीच्या मृत्यूनंतरही आपल्या राज्यासाठी निकराचा लढा दिला होता.

# विकासाच्या वाटेवर मानवजातीचे आरोग्य हरवत आहे का?

आज आपण विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या अत्यंत प्रगत युगात जगत आहोत. माणसाने अवकाशात झेप घेतली, समुद्राच्या तळाशी पोहोचला, कृत्रिम बुद्धिमत्तेपासून आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानापर्यंत असंख्य क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती केली. जग जवळ आले, माहिती क्षणात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचू लागली. परंतु या सर्व प्रगतीच्या मध्यभागी एक मूलभूत प्रश्न आज आपल्यासमोर उभा आहे—या विकासाच्या बदल्यात आपण आपले आरोग्य तर गमावत नाही ना? आज मोठमोठी रुग्णालये रुग्णांनी भरलेली दिसतात. शहरांमध्ये अत्याधुनिक हॉस्पिटल्सची संख्या वाढत आहे. विविध प्रकारच्या तपासण्या, शस्त्रक्रिया, औषधे आणि उपचारपद्धती उपलब्ध आहेत. तरीसुद्धा सामान्य माणूस अधिकाधिक आजारी का पडत आहे? लहान वयातच मुलांना गंभीर आजार का होत आहेत? तरुण वयातच अनेकांना किडनी, यकृत, फुफ्फुस, हार्मोन्स, मधुमेह, रक्तदाब अशा विविध आरोग्यसमस्यांना सामोरे का जावे लागत आहे? हा प्रश्न केवळ डॉक्टरांचा, रुग्णालयांचा किंवा सरकारचा नाही. हा संपूर्ण मानवजातीच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

### लहान मुलांच्या आजारांकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ

आज आपण अशा घटना ऐकतो की एखाद्या लहान मुलाच्या उपचारासाठी कोट्यवधी रुपयांचे इंजेक्शन किंवा औषध आवश्यक झाले. त्यासोबत लाखो रुपयांचा इतर वैद्यकीय खर्च करावा लागतो. काही दुर्मिळ आजारांमध्ये उपचारांचा खर्च सामान्य कुटुंबाच्या आवाक्याबाहेर जातो. एका बाजूला आपण आरोग्यसेवेत आधुनिक तंत्रज्ञानाचा अभिमान बाळगतो आणि दुसऱ्या बाजूला एवढ्या लहान वयातील मुलांना गंभीर आजारांचा सामना करावा लागत आहे. मग आपण स्वतःला विचारले पाहिजे—आपण आजार बरे करण्याच्या दिशेने अधिक प्रगती केली आहे की आजार निर्माण होण्याची कारणे वाढवली आहेत? आज कोणाला किडनीचा त्रास आहे, कोणाला फुफ्फुसांचा, कोणाला यकृताचा, कोणाला हार्मोनल समस्या आहेत. महिलांमध्ये मासिक पाळी अनियमित होणे, अत्यधिक रक्तस्राव, गर्भाशयाशी संबंधित विविध समस्या अशा अनेक तक्रारी मोठ्या प्रमाणात ऐकायला मिळतात. मात्र या सर्व समस्यांचे एकच कारण आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. आनुवंशिकता, जीवनशैली, आहार, ताणतणाव, संसर्ग, पर्यावरणीय प्रदूषण, लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव आणि इतर अनेक कारणे आरोग्यावर परिणाम करू शकतात. त्यामुळे वैज्ञानिक पद्धतीने कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

### आपल्या शेतीकडे आणि अन्नव्यवस्थेकडेही पाहावे लागेल

आपण जे खातो, त्याचा आपल्या आरोग्याशी थेट संबंध आहे. त्यामुळे शेतीमध्ये वापरली जाणारी खते, कीटकनाशके, तणनाशके आणि इतर रसायने यांचा योग्य वापर, त्यांचे अवशेष, पर्यावरणावरील परिणाम आणि मानवी आरोग्याशी असलेले संभाव्य संबंध यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झाला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की शेतीतील प्रत्येक रासायनिक पदार्थ हा आजाराचे कारण आहे किंवा प्रत्येक आधुनिक शेतीपद्धत धोकादायक आहे. पण काय सुरक्षित आहे, किती प्रमाणात सुरक्षित आहे, त्याचा दीर्घकालीन परिणाम काय आहे, याचा निष्पक्ष आणि सातत्यपूर्ण अभ्यास झाला पाहिजे. शेतकऱ्यालाही सुरक्षित उत्पादन हवे आहे, ग्राहकालाही सुरक्षित अन्न हवे आहे आणि पुढील पिढीलाही निरोगी पृथ्वी हवी आहे. शेती, विज्ञान, आरोग्य आणि पर्यावरण या चारही क्षेत्रांचा एकत्रित विचार करण्याची गरज आहे.

### ज्ञान जीवन देणारे असावे, जीवन घेणारे नव्हे

मानवाने ज्ञान मिळवले पाहिजे. विज्ञानाची प्रगती झाली पाहिजे. नवीन तंत्रज्ञान आले पाहिजे. उद्योग वाढले पाहिजेत. अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. पण या सर्वांचा अंतिम उद्देश काय? मानवाचे जीवन अधिक सुरक्षित, निरोगी, सन्मानाचे आणि आनंदी करणे हा विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. समजा, एखादे नवीन तंत्रज्ञान आपण निर्माण केले. त्यातून आपल्याला मोठे आर्थिक यश मिळाले. पण त्या तंत्रज्ञानामुळेच आपल्या पर्यावरणाचे नुकसान झाले, माणसाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाला किंवा पुढील पिढी धोक्यात आली, तर त्या ज्ञानाच्या उपयोगाचा आपण पुन्हा विचार केला पाहिजे.

### ज्ञान माणसाला जीवन देणारे असावे; ज्ञान माणसाचे जीवन धोक्यात आणणारे नसावे.

### वैद्यकीय क्षेत्र : सेवा की व्यवसाय?

डॉक्टर हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. डॉक्टरांमुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात. अनेक डॉक्टर अत्यंत प्रामाणिकपणे आणि सेवाभावाने काम करतात. त्यामुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राकडे संशयाने पाहणे अन्यायकारक ठरेल. परंतु त्याच वेळी एक प्रश्न विचारणेही आवश्यक आहे—आरोग्यसेवा ही सेवा राहिली आहे की ती हळूहळू मोठा व्यवसाय बनत चालली आहे?

एका रुग्णाला एका डॉक्टरकडे गेल्यावर "सध्या विशेष काही नाही, औषधे घ्या आणि निरीक्षण ठेवा" असे सांगितले जाते; तर दुसऱ्या डॉक्टरकडे गेल्यावर अनेक तपासण्या, प्रक्रिया किंवा उपचारांची आवश्यकता सांगितली जाते. दोन्ही डॉक्टर पात्र असतात, दोघांनी तपासण्या केलेल्या असतात, तरीही मतभिन्नता निर्माण होते. अशा परिस्थितीत सामान्य माणूस गोंधळतो. त्याला प्रश्न पडतो—नेमके कोणावर विश्वास ठेवायचा? माझ्या स्वतःच्या कुटुंबातही अशा प्रकारचा अनुभव आला आहे. माझे वडील आजारी असताना आणि माझा भाऊ आजारी असताना आम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी वैद्यकीय सल्ले घ्यावे लागले. एका ठिकाणी काही दिवस औषधे घेण्यास सांगून परिस्थिती सामान्य असल्याचे सांगण्यात आले; दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर अधिक उपचारांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले. अशा अनुभवातून रुग्ण आणि त्याचे कुटुंबीय मानसिकदृष्ट्याही अस्वस्थ होतात. याचा अर्थ एखादा डॉक्टर चुकीचा आहे, असा सरसकट निष्कर्ष काढता येत नाही. प्रत्येक रुग्णाची परिस्थिती वेगळी असते आणि वैद्यकीय निर्णयांमध्ये मतभेद होऊ शकतात. परंतु पारदर्शकता, दुसरे वैद्यकीय मत घेण्याची मुभा, उपचारांची योग्य माहिती आणि खर्चाबाबत स्पष्टता ही रुग्णाची मूलभूत गरज आहे. क्रमश :

**निवृत्ती तायडे**

रा. हिवरखेड ता. तेल्हारा. जि. अकोला

# निसर्गाची हानी करून जगणार कसे, यक्षप्रश्न



### समस्या :- पाणी प्रदूषण

रासायनिक खतांच्या आत्यंतिक वापरामुळे, विविध प्रकारच्या औद्योगिक कारखान्यांमुळे जसे औषधांचे कारखाने, रासायनिक खतांचे कारखाने, वीज निर्मिती प्रकल्प, कागदाचे, कापड रंगविण्याचे कारखाने यासारख्या अनेक कारखान्यांमुळे नदीतील, विहिरीतील, जलाशयातील, तलावातील पाणी प्रदूषित झाले. पाण्यात मोठ्या प्रमाणात नायट्रेट्स व क्षारांचे प्रमाण वाढले. वनस्पतीचे अन्न मानवाच्या शरीरात जावू लागले. ते जावू नये म्हणून आज उपलब्ध पाणी आणि समुद्राचे पण पाणी पिण्यायोग्य करण्यासाठी मशिन्स, यंत्रे तयार आहेत. तो एक पुनः व्यवसाय सुरू झाला आहे. अनेक राष्ट्र त्यास बळी पडत आहेत. त्यावरील इतर संशोधनही सुरू आहे. समुद्राच्या पाण्याचे शुद्धीकरण तर होईल परंतु शुद्ध केलेल्या पाण्यातील अशुद्ध रेसिड्यू पुन्हा एक नवीन समस्या होणार आहे व भविष्यात त्यासाठी नवीन यंत्रे तयार होतील. एका समस्येतून दुसऱ्या समस्येत जाणे ही पाश्चिमात्यांची देण आहे. त्यावर उपाय शोधण्याऐवजी त्याला सर्व जग बळी पडत आहे.

एकाने केलेले प्रदूषण सर्वांनाच लागू आहे याची जाणीव झाल्यामुळेच कार्बनकडे व त्यातील संशोधनाकडे जगाचे लक्ष आहे. त्याच जगाला या कार्बनमुळे त्रास व्हायला लागला आहे हे लक्षात आले ही महत्वाची बाब आहे. जागतिक स्तरावर एकंदरच ग्लोबल वॉर्मिंगचा प्रभाव तीव्रतेने जाणवत आहे. यामुळे संपूर्ण मानवतेचे अस्तित्वच पणास लागले आहे. असे लक्षात आल्यानंतर गॅट कराराच्या अंतर्गत प्रगत राष्ट्रांना आता या कार्बन ट्रेडिंगची आठवण आली व त्यांच्या देशात जागा शिल्लक नाही म्हणून सार्वत्रिकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जागतिकदृष्ट्या यासाठीचे कायदे तयार होत आहेत व त्या कायद्यांमुळे या प्रगत राष्ट्रांना त्याच्या मोबदल्यात जागा लागणार आहे. त्यासाठी कार्बन ट्रेडिंग नांव देऊन एक नवीन उद्योग तयार झाला आहे. लक्षात घेतले पाहिजे ते असे की ज्यांना जगायचे आहे व जगण्यासाठी निसर्ग आवश्यक आहे, निसर्गात झाडे, नदी, नाले वाहात नसतील तर कसे जगावे असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पूर्वी आमच्याकडे रोगराई अतिशय कमी होती. एकच वैद्य गावात शहरात असायचा. तो निदान करताना कोणत्याही प्रकारच्या पॅथॉलॉजिकल टेस्ट न करता योग्य निदान करायचा व अतिशय कमी खर्चात जडी-बुटी, काढे, आसव, अरिष्ट देऊन रुग्णाला ठणठणीत बरा करायचा. अगदी साध्या सोप्या घरगुती इलाजांनी रोगराई आटोक्यात येत असे. आज तर हजारो रोगांसाठी हजारो डॉक्टर्स उपलब्ध आहेत व समाज औषधे खाऊन जगत आहे. रोगग्रस्त समाज चांगला विचार करू शकत नाही व त्यामुळेच दुबळा होत आहे. रोज नवीन रोग जन्माला येत आहेत व नवीन मशिनरी माणसाची तपासणी करायला कार्यरत होत आहेत. लाखो करोडो रुपये खर्च करून हे सर्व सुरु आहे, त्यातूनच समाजाची लूट होत आहे. मृत्यूदर घटला, मानवाचे आयुष्य वाढले असे चित्र उभे करण्यात आले आहे. खरे आमचेकडे 'शतायुषी भव' हा आशीर्वाद उगाच दिल्या जात नव्हता, तसे आयुर्मान होते म्हणूनच त्याला महत्व होते. सहजतेने आनंददायी व निरोगी १०० वर्षे आयुष्य जगणे आमच्याकडे होते. ही इतकी सबलता उत्तम अन्नातून आम्हाला मिळत होती. उत्तम पाणी, शुद्ध हवा (सुजल-सुफल) असल्याने रोगराईच नव्हती व जे काही छोटे-मोठे रोग होते ते वैद्यांनी दिलेल्या औषधाने बरे होत असत. त्यांनी दिलेल्या औषधातून नव्या रोगाचा जन्म होत नसे. आज तर जे रासायनिक औषध दिले जाते त्यातून नवीन रोग जन्माला येत आहेत व रोगराई काही केल्या नियंत्रणात येत नाही. हे सर्व रासायनिक खतांच्या आत्यंतिक वापराने झाले यात दुमत नाही. ही संपूर्ण प्रक्रिया पाश्चिमात्य देशांमध्ये झाली तीच आमचे कडे झाली. त्यासाठीचे औषधांचे कारखाने तयार झाले, तसेच आमच्याकडेही सुरू झाले.

वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येते की, एका समस्येतून सुटका तर नाहीच परंतु दुसऱ्या समस्येने जन्म घेतला व ती समस्या सुटत नाही तर पुढे समस्याच समस्या सुरू राहिल्या. समस्यांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न झाला नाही. पंडित नेहरूंना (भारताचे पहिले पंतप्रधान) रासायनिक शेती करण्यात येऊ नये, कारण उत्पन्न कमी येते हे संशोधनात्मक बाबीतून आमच्या संशोधकांनी सांगितले तरी त्यांनी (पाश्चिमात्य सांगतात तेच खरे, आपले खोटे) ते मानले नाही. आमची संशोधन केंद्रे बंद करण्यात आली व आज त्यामुळेच ही भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.

एक म्हण प्रसिद्ध आहे, "जसे खाल, तसेच व्हाल". तेच दृश्य सर्वत्र आहे, कायद्याची भीती नाही. ती अतिशय कडक असती तर कमीत कमी पाश्चिमात्यांमध्ये जो राष्ट्रभावना, शिस्त आहे ती तरी राहिली असती. तेवढे मात्र पाश्चिमात्य राष्ट्र त्याबाबतीत सधन आहेत. कारण दुसऱ्यांवर राज्य करावयाचे असेल तर आपल्यात गुण असावयास हवेच अन्यथा आपण ही पारतंत्र्यात जाऊ हे मात्र त्यांना चांगले ठाऊक आहे. त्यामुळे त्यांच्या त्यांच्या देशातील तज्ज्ञांनी योग्य ते शिक्षण, कायद्याविषयीची नेमकी जाणीव, राष्ट्राभिमानास प्राधान्य, राष्ट्रपुरुषांचा सातत्याने सन्मान यांचा समावेश आणि आचरणाविषयी शिक्षणात अंतर्भाव असण्याकडे विशेष लक्ष दिल्याचे लक्षात येते. परंतु आपल्याकडे या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यात आले कारण त्यात राजकारण आहे व त्याचा फायदा करून घेण्यासाठी मग दुसऱ्याचा बळी देण्याचा प्रसंग आला तरी चालेल या पद्धतीने ती व्यवस्था गेल्या ५० वर्षात आमच्याकडे जोपासली व तीच रीती बरोबर आहे असे सर्वांवर बिंबविण्यात आले. मुळात एका विशिष्ट चाकोरीत काम करणारा कामगार वर्ग निर्माण व्हावा यासाठी इंग्रजांनी जी शिक्षण प्रणाली दिली त्याचीच आजतागायत अंमलबजावणी सर्व स्तरात सुरू असल्याचे दिसते. याला मुख्यत्वे शैक्षणिक क्षेत्रातील तथाकथित विद्वान जे आजही इंग्रजांच्या प्रभावात आहेत, मुख्यत्वे कारणीभूत आहेत. मग त्यातूनच सत्ता हस्तगत करण्यासाठी, वैयक्तिक लाभासाठी आणि केवळ स्वार्थासाठी काम करणारी पिढी निर्माण झाली.

### समस्या :- जमीन प्रदूषण

प्रदूषणाची प्रक्रिया शेतातही झाली. शेतात आमचेकडे कोणत्याही प्रकारची खते वापरली जात नव्हती. १९६० पर्यंत खते वापरली नाही. १९६० पासून रासायनिक खतांचा सर्वप्रथम उपयोग पंजाब , हरियाणा व दक्षिणेत आंध्र प्रदेशात सुरू झाला. कालांतराने जमिनीतूनच अनेक प्रकारची रोगराई शेत पिकांवर यायला लागली. माणूस त्यांना मारण्यासाठी विविध कीटक-नाशके औषधी वापरू लागले. कारण त्याशिवाय पर्याय नव्हता. वापरली नाहीच तर अन्नधान्याचा नाश व्हायचा. म्हणजे आम्ही समस्येच्या मुळाशी न जाता एका समस्येतून दुसऱ्या समस्येत जात आहोत.

शेतीत रासायनिक खतांच्या वापरातून अनेक समस्या निर्माण झाल्या. शेतजमीन कडक झाल्यामुळे शेतात बैलाला त्रास व्हायला लागला किंवा त्याचे कडून वखरण होईनासे झाले. त्यातूनच गतीने शेती झाली पाहिजे यासाठी ट्रॅक्टरचा वापर सुरू झाला. मोठी अवजारे ट्रॅक्टरला जुंपण्यात आली. ट्रॅक्टरची किंमत व डिझेल खर्च पूर्ण करण्यात पैसा खर्च होत होता, तसेच बी-बियाणे विकत घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. या समस्येतून शेतकरी कर्जबाजारी व्हायला लागला व त्यातूनच पुढे आत्महत्या होत आहेत. खरे तर शेत जमीन रासायनिक खते वापरण्यापूर्वी मऊ का होती? याचा कुठेही विचार न आमच्या विद्यापीठांतून झाला ना राज्यकर्त्यांनी केला. ट्रॅक्टर आल्याने बैलाचे काय काम, म्हणून बैलाला विकले, त्यातच कत्तलखान्यांचा जन्म झाला. कत्तलखाना बंद नको व्हायला म्हणून आमचे गोधन ही विकण्याची प्रक्रिया सुरू झाली. कारण गोधन ठेवून त्यास पोसायचे कसे? त्यापेक्षा विकून पैसे मिळवता येतात. गोधनाची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागली आणि जोडधंदा संपला. त्यामुळे एकंदर गोधन अतिशय कमी झालेले आहे. त्यामुळे आम्हाला दूध खरच मिळते का? हा एक गंभीर प्रश्न आहे. मध्यंतरी वर्तमानपत्रातून रासायनिक दुधाची बातमी आली होती. किती भयावह आहे!

शेतीत रासायनिक खत वापरल्याने महत्वाचा परिणाम असा झाला की आमची शाश्वत सेंद्रिय शेती संपली. त्यामुळे गांडुळे संपली, गांडुळे संपल्याने जमिनीची सच्छिद्रता संपली, सच्छिद्रता संपल्याने जमिनीत पाणी मुरण्याची प्रक्रिया बंद झाली. प्रथम याप्रकारची प्रक्रिया प्रगत राष्ट्रांमध्ये झाली व त्यामुळे पाण्याची पातळी कमी झाली आणि धरणे बांधली जाऊ लागली. त्यालाच अनुसरून आम्हीही धरणे बांधण्याचा नवा खर्च सुरू केला. विहिरी आटायला लागल्या, त्याचाच भाग म्हणून पुढे बोरिंग मशिन्सनी जन्म घेतला व भूगर्भातील खालच्या पातळीतून पाणी काढण्याचा नवीन कार्यक्रम सुरू झाला. विहिरीतले पाणी का आटले याकडे दुर्लक्ष केले व दरवर्षी विहीर खोदण्याचा (खोली वाढविण्याचा) खर्च मागे लागला. अन्नधान्य टिकले पाहिजे म्हणून जास्त पाण्याचा उपसा वाढला. रासायनिक खते वापरल्याने ही प्रक्रिया होते, कारण जास्तीचे क्षार जमिनीवर झाल्याने त्यांना विभाजित करून हवे तेवढे क्षार झाड घेत असते त्यामुळे पाणी दिले नाही तर जमीन कोरडी व कडक होते व झाडे सुकायला लागतात. त्यासाठी पाणी उपसून देणे ही क्रिया सुरू झाली. पाण्याची खोली वाढल्याने मोटेच्या (बैलाच्या सहाय्याने) ऐवजी इलेक्ट्रिक पंप आले. सुरुवातीला १ एच.पी., आज तर १०, १२, १५ एच.पी. पर्यंतच्या मोटारीच्या सहाय्याने पाणी उपसणे सुरू आहे. या इलेक्ट्रिक पंपाचे वीज बिल भरण्यात परत पैशाचा खर्च वाढतच गेला. आज पाणी संपले आहे ही स्थिती झाली आहे. म्हणजे एकीकडे रासायनिक खते वापरून शेतात सुरुवातीला १५-२० वर्ष उत्पादन तर वाढले पण आता उत्पादन कमी कमी होत आहे. जमिनीची सुपीकता शक्ती संपली व एकंदरच उत्पादनाच्या तुलनेत उत्पादन खर्च रासायनिक शेतीत वाढला. याकारणास्तव पुन्हा रासायनिक शेती नको, सेंद्रिय शेती करावी असा धोशा सरकारने सुरू केला व त्यासाठी ज्या वैज्ञानिकाने ४० वर्षे रासायनिक शेती करण्यास शेतकऱ्यांना सांगितले त्याच व्यक्तीला म्हणजेच डॉ. स्वामीनाथन यांना सेंद्रिय शेतीच्या राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष करण्यात आले. केवढी शोकांतिका आहे, या सारखे दुर्दैव नाही.

### समस्या :- हवा प्रदूषण

ज्याप्रमाणे वातावरणात मच्छर आला, मच्छर कोठून आला, कसा काय आला? मच्छर मारण्यासाठीचे औषध तयार झाले त्यातून उपद्रवात नवी भरच पडली. एखाद्या गोष्टीसाठी तत्कालीन उपाय असू शकतो. म्हणजे समस्येच्या मुळाशी न जाता समस्येवर उपाय असा प्रयोग सर्वत्र सुरू आहे. म्हणून आपल्याकडे मच्छर मारण्यासाठीचा व्यापार करोडो रुपयांचा आहे. मच्छराचा जन्म अशुद्ध पाण्यात, अशुद्ध वातावरणात होतो. त्याला शुद्ध करण्याऐवजी मच्छरदाणीचा व्यवसाय, वेगवेगळ्या मच्छरांना हाकलून लावण्यासाठी रिफीलचा उपयोग अशी प्रक्रिया सुरू आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

प्रदूषणातील पुढचा महत्वाचा भाग म्हणजे प्रचंड प्रमाणात औद्योगिकीकरण, पेट्रोजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर, विद्युत निर्मितीसाठी कोळसा आणि विविध उद्योगांसाठी विविध खनिजांचे शोषण करण्यात आले. यामुळे कार्बन डायऑक्साईड व नायट्रोजन व इतर विषारी रासायनिक पदार्थांचे वातावरणातील प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढत आहे. एकीकडे औद्योगिकीकरणाची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा प्रचंड प्रमाणात वापर सुरू आहे. यामुळे जंगलाचे प्रमाण कमी होणे हे मूळ कारण आहे कारण असे की, झाड हे कार्बन डायऑक्साईड व नायट्रोजन डायऑक्साईडचा अन्न म्हणून उपयोग करते व मानवाला ऑक्सिजनची निर्मिती होते. जंगलाचे प्रमाण कमी झाल्याने प्राणवायूचे प्रमाण कमी झाले हे साधे समीकरण आहे. पूर्वी जंगलाचे प्रमाण आपल्या भूप्रदेशावर जवळपास ४० टक्के होते, आज ते १२-१५ टक्केच उरले आहे. झाडांची संख्या कमी आणि मानवाची जास्त हे व्यस्त प्रमाण आहे. त्यामुळेच प्राणवायूची कमतरता तीव्रतेने जाणवते आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग व एकंदरच पृथ्वीचे तापमान वाढण्यास कारणीभूत ठरले आहे. मानवाने आपल्या उपभोगासाठी निसर्गतः निर्मित मोठ्या वृक्षांची कटाई केली, त्यातूनच ही गंभीर समस्या निर्माण झाली. बदल्यात सिमेंटचे जंगल उभे झाले. त्यातच पेट्रोजन्य पदार्थांच्या अत्याधिक वापराने आणि विविध खनिजांच्या वापराने एकंदरच हवा या मानवाला अत्यावश्यक असलेल्या घटकाचे अतोनात नुकसान झाले आहे.

**अरविंद कडबे**

**ओलावा फाउंडेशन.**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# ‘काटे बाईंची शाळा’ उद्ध्वस्त; मौल्यवान जागेवर भूमाफियांची नजर ?

## शेकडो मुलींच्या भविष्याला दिशा देणारी शाळा बंद; प्रशासनाच्या भूमिकेवर संताप





प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**यवतमाळ :** शेकडो गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील मुलींच्या आयुष्याला शिक्षणाची दिशा देणारी यवतमाळ शहरातील ऐतिहासिक ‘काटे बाईंची शाळा’ आज बंद अवस्थेत असून, तिची इमारत व परिसर दुर्लक्षित पडला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील मोक्याची जागा असलेल्या या शाळेच्या दुरवस्थेची पाहणी कॉकरोच जनता पक्षाच्या पश्चिम विभागीय कोअर कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. शाळेची अवस्था पाहून पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला.

एकेकाळी या शाळेत ३०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी शिक्षण घेत असल्याचे सांगितले जाते. गरीब, वंचित आणि मागासवर्गीय कुटुंबातील मुलींसाठी ही शाळा शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होती. येथून शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रांत यश मिळविले. मात्र, विद्यार्थिनींच्या शिक्षणाला आधार देणारी हीच वास्तू आज ओसाड आणि दुर्लक्षित अवस्थेत का ठेवण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे.

इतक्या मोठ्या पटसंख्येची शाळा बंद करण्याची वेळ का आली? शाळा बंद करण्यामागील प्रशासकीय कारणे कोणती? विद्यार्थिनींचे स्थलांतर कुठे करण्यात आले? शाळेची इमारत व जमीन आता कोणाच्या ताब्यात आहे? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेला द्यावीत, अशी मागणी कॉकरोच जनता पक्षाने केली.

दरम्यान, शाळेच्या मौल्यवान जागेवर भूमाफियांची नजर असल्याचा गंभीर आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. त्यामुळे शाळा बंद होण्यामागे केवळ प्रशासकीय कारणे आहेत की त्यामागे अन्य काही हितसंबंध आहेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

### ‘शाळा बंद, जागा मोकळी’ हा प्रकार चालणार नाही

▪ शहराच्या मध्यवर्ती भागातील मोक्याची शैक्षणिक जागा अशाच पद्धतीने दुर्लक्षित ठेवून भविष्यात तिचा अन्य कारणांसाठी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. शाळेचे तातडीने पुनर्वसन करून ती पुन्हा सुरू करावी. इमारत, जमीन, विद्यार्थी संख्या, शिक्षकांची उपलब्धता आणि शाळा बंद करण्याचा निर्णय याबाबत प्रशासनाने श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली.

### शासनदरबारी पाठपुरावा करणार

▪ कॉकरोच जनता पक्षाचे पश्चिम विभागीय कोअर कमिटी सदस्य डॉ. नितीन दिघे, ॲड. जयसिंग शेरे, महिया गौरखेडे, मयूर मालखेडे, निलक्षी वानखेडे, प्रकाश भिसे, आदेश चीकराम, संजय बोरकर आणि प्रमोदिनी रामटेके यांनी पाहणी केली. “ज्या शाळेने शेकडो मुलींच्या आयुष्याला दिशा दिली, ती शाळा अशीच उद्ध्वस्त अवस्थेत पडू देणार नाही. शाळेचे पुनर्वसन करून ती पुन्हा सुरू करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू,” असा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# पाच महिन्यांत २,३५० वीजचोरीची प्रकरणे उघड

## महावितरणची धडक मोहीम; ४ कोटी ५१ लाखांची वीजचोरी उघडकीस

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**यवतमाळ :** महावितरणने वीजचोरीविरोधात राबविलेल्या धडक मोहिमेत गेल्या पाच महिन्यांत अमरावती परिमंडळातील तब्बल २ हजार ३५० वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणली आहेत. यामध्ये थेट वीजतारेवर आकडा टाकणे तसेच वीजमीटरमध्ये फेरफार केल्याची २ हजार १९० प्रकरणे असून, त्यातून ४ कोटी ५१ लाख रुपयांची वीजचोरी निष्पन्न झाली आहे. उर्वरित १६० प्रकरणांचे मूल्यांकन सुरू आहे.

एप्रिलपासून सुरू असलेल्या या विशेष तपासणी मोहिमेत अमरावती जिल्ह्यात १ हजार १६४ प्रकरणांत १० लाख २० हजार युनिटची, म्हणजेच २ कोटी १६ लाख ५५ हजार रुपयांची वीजचोरी आढळली. यवतमाळ जिल्ह्यात १ हजार १८६ प्रकरणांत ९ लाख ९९ हजार युनिटची, म्हणजेच २ कोटी ३४ लाख ७५ हजार रुपयांची वीजचोरी उघड झाली.

यवतमाळ जिल्ह्यात दारव्हा विभाग आघाडीवर असून, येथे सर्वाधिक ४५२ वीजचोरीची प्रकरणे पकडण्यात आली. त्यानंतर यवतमाळ विभागात ४०७, पांढरकवडा विभागात २२८, तर पुसद विभागात ९९ प्रकरणे उघडकीस आली. अमरावती जिल्ह्यात अचलपूर विभागात ५२१, अमरावती ग्रामीणमध्ये ४४९, मोर्शीत ११२, तर अमरावती शहर विभागात ८२ प्रकरणे आढळली.

निष्पन्न झालेल्या ४ कोटी ५१ लाख ३१ हजार रुपयांच्या चोरीच्या बिलापैकी १ हजार २६० ग्राहकांनी २ कोटी ७९ लाख २८ हजार रुपयांचा भरणा केला आहे. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ४९९ ग्राहकांनी १ कोटी १४ लाख ५१ हजार रुपये जमा केले आहेत. तसेच ९७९ प्रकरणांत ३२ लाख रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

वीजचोरीची रक्कम व दंड मुदतीत न भरणाऱ्यांविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ मधील कलम १३५ अन्वये फौजदारी कारवाई केली जात आहे. या कलमानुसार तीन वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे.

वीजचोरीमुळे होणारी वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी तपासणी मोहीम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. ग्राहकांनी अधिकृत वीजपुरवठ्याचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**सावळी सदोबा :** उमरी कापेश्वर ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीच्या तीन सदस्यांसह ग्रामस्थांनी २५ ऑगस्ट रोजी पंचायत समिती प्रशासनाकडे तक्रार अर्ज सादर केला होता.

ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करावी, तसेच सदस्यांना विश्वासात न घेता सुरू असलेल्या विकासकामांची तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली होती.

या तक्रारीची दखल घेत आर्णी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी तीन सदस्यीय चौकशी समिती गठित केली आहे. विस्तार अधिकारी जी. आर. इंगोले यांची समिती प्रमुख म्हणून, तर कनिष्ठ लेखा अधिकारी पवन गोडाम आणि शाखा अभियंता डुबकवाड यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ही समिती ग्रामपंचायतीची कागदपत्रे, आर्थिक व्यवहार, विकासकामांच्या नोंदी तसेच संबंधित कागदपत्रांची तपासणी करणार आहे. चौकशी पूर्ण करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश समितीला देण्यात आले आहेत. त्यामुळे चौकशी अहवालाकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# खर्गेविरोधातील घटनेचा काँग्रेसकडून निषेध

## निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी



प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**पुसद :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात हल्दीघाटी येथे घडलेल्या कथित घटनेचा पुसद शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेची सखोल, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली.

देशातील प्रमुख राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांसोबत घडलेली ही घटना गंभीर स्वरूपाची असून, अशा प्रकारच्या घटना लोकशाही मूल्यांना बाधा आणणाऱ्या आहेत.

राजकीय मतभेद असले तरी प्रत्येक नेत्याला सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे संबंधित घटनेची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली.

या संदर्भात पुसद शहर काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त करून प्रशासनाकडे तातडीने चौकशीची मागणी केली.

निवेदनावर प्रदेश महासचिव सय्यद इस्तियाक, शहराध्यक्ष झिया शेख, दलित आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रभाकर विघ्ने, युवक विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोडे, संजय कान्हेड, गाझी उसामा, सेनेचे विजय बाबर, फिरोज खान, युवक काँग्रेस अध्यक्ष डॉ. मोहसीन, प्रकाश नेमयते, रवी कांबळे आणि बाबाराव वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पुसद येथे लॉजमध्ये तरुणाची आत्महत्या

## पोलिसांकडून एका तरुणीची चौकशी

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**यवतमाळ :** पुसद शहरातील रामकृष्ण लॉजमध्ये २० वर्षीय तरुणाने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवार, २ सप्टेंबर रोजी रात्री उघडकीस आली.

अतिश सिद्धार्थ धुळे (२०) रा. निंबी पार्डी, ता. पुसद) असे मृत तरुणाचे नाव आहे. मृताचे मामा राहुल सुधाकर धवसे (४०) यांनी पुसद शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून घटनेची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रात्री सुमारे दोन वाजताच्या सुमारास घडल्याचे समोर आले आहे. घटनेच्या वेळी अतिशसोबत एक तरुणीही लॉजमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित तरुणीला पुसद शहर पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मात्र, तरुणाने हे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणातून उचलले, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्राथमिक पंचनामा केला. त्यानंतर अतिशचा मृतदेह शासकीय उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पुसद शहर पोलिस ठाण्याचे पीएसआय राजू ठोमरे करीत आहे.

# बंदीभागातील प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

## जमीन हक्क, रस्ते व स्मशानभूमीच्या प्रश्नांवर तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**उमरखेड :** बंदीभागातील वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. खरबी ग्रामस्थांच्या आमरण उपोषणानंतर १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक झाली. या बैठकीत बंदीभागातील जमीन हक्क, महसूल नोंदी, रस्ते आणि स्मशानभूमीच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

खरबी येथील ग्रामस्थांनी १२ ऑगस्ट रोजी विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण केले होते. आंदोलनाची दखल घेत प्रशासनाकडून प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, उपोषण मागे घेणे हा प्रश्नाचा शेवट नसून बंदीभागातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी पाठपुरावा सुरूच ठेवण्यात आला. माजी आमदार उत्तमराव इंगळे, डॉ. आरतीताई फुपाटे, माजी आयुक्त संभाजीराव सरकुंडे आणि भाजपा शहराध्यक्ष अतुल खंदारे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. खरबीतील जमिनीचे हक्क, सातबारा नोंदी, भोगवटादार वर्ग-२ जमिनींची फोडपट्टी, वारसाहक्क तसेच हक्कसोड यासंबंधीचे प्रश्न बैठकीत मांडण्यात आले. बंदीभागातील दुर्गम गावांना फुलसावंगी-किनवट प्रमुख मार्गाशी डांबरी रस्त्याने जोडण्याची मागणीही करण्यात आली. वन विभागाच्या हद्दीमुळे अडथळे येत असल्यास संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून तोडगा काढण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिले. ज्या गावांमध्ये अद्याप स्मशानभूमीची सुविधा नाही, त्या गावांनी प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांचे प्रश्न गांभीर्याने ऐकून संबंधित विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

### ‘प्रश्न सुटेपर्यंत पाठपुरावा’

बंदीभागातील प्रश्न निकाली निघेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल. प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली नाही तर पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा माजी आमदार उत्तमराव इंगळे यांनी दिला. बैठकीस बबलू जाधव, उत्तम पांडे, विश्वनाथजी खराटे, के. सी. खंदारे, पवन मेंढे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोकप्रतिनिधींच्या सूचविलेल्या कामांना मिळणार गती

## निधी शंभर टक्के खर्च करण्याचे निर्देश

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**यवतमाळ :** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या कामांना प्राधान्य देऊन ती तातडीने पूर्ण करावीत, तसेच कामांच्या प्रगतीचा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी विभागप्रमुखांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत कामांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. या वेळी जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपजिल्हाधिकारी पूनम आहिरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. २३ ऑगस्ट रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार, आमदार व इतर लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचना आणि निर्देशांच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. लोकप्रतिनिधींच्या सूचनांवर संबंधित विभागांनी समन्वयाने आणि तत्परतेने कार्यवाही करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असून, संबंधित विभागांनी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर नावीन्यपूर्ण कामांचे प्रस्तावही सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मातंग समाजाचा महामोर्चा

## ‘हक्क मागतोय; मोठ्या भावाने आमच्या वाटेला येऊ नये’ : नामदेव ससाणे

प्रतिनिधी ३ सप्टेंबर






**उमरखेड :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने बुधवारी (ता. २) उमरखेड येथे जनआक्रोश महामोर्चा काढण्यात आला. हजारो समाजबांधव सहभागी झालेला हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चानंतर झालेल्या सभेत उपवर्गीकरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली.

माजी आमदार नामदेव ससाणे म्हणाले, ‘‘आजवर मोठ्या भावाने समता, न्याय आणि बंधुतेच्या भावनेने काम केले असते, तर आम्हाला आमच्या लेकराबाळांसाठी मोर्चा काढण्याची वेळ आली नसती. आम्ही आमचा हक्क मागत आहोत. मोठ्या भावाने आमच्या वाटेला येऊ नये.’’

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील वंचित घटकांना न्याय मिळण्यासाठी उपवर्गीकरणाची गरज असल्याचे ससाणे यांनी सांगितले. ‘‘आमची मुले आता सुशिक्षित झाली आहेत. त्यांना पुढे जाण्याची संधी मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने वंचित घटकांना उपवर्गीकरणाच्या माध्यमातून न्याय देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. शासनाने तातडीने अंमलबजावणी करावी; अन्यथा आंदोलनाचा रेटा कायम ठेवावा लागेल,’’ असा इशाराही त्यांनी दिला.

किनवटचे माजी नगराध्यक्ष के. मूर्ती यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तेलंगणा राज्याने आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केल्याचे सांगितले. यावेळी विविध वक्त्यांनी उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ भूमिका मांडली.

दरम्यान, मातंग समाजातील काही नेत्यांबाबत होत असलेल्या कथित असभ्य टीकेबद्दल सभेत नाराजी व्यक्त करण्यात आली. ‘‘आमचा कुणालाही विरोध नाही; आमचे भांडण शासनासोबत आहे,’’ अशी भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक मारोतराव वाडेकर होते. गणपतराव भिसे, डॉ. अंकुश दोतावळे, कैलास खंदारे, के. डी. पवार (हदगाव), धुरपता कांबळे, संजय कंठाळे, गुणवंत काळे, विजय रणखांब आदींनी विचार व्यक्त केले. राजू गायकवाड यांनी सूत्रसंचालन, तर दत्तात्रय काळे यांनी प्रास्ताविक केले. महामोर्चाच्या यशस्वितेसाठी जय बनसोड, शेवतराव गायकवाड, मुन्ना पांढरे, प्रकाशक, उत्तम काळे, नरेंद्र खंदारे यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले. कृष्णा लामतिळे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जीवनदीप आश्रमशाळेत पर्यावरण संदेश

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**कळंब :** येथील जीवनदीप आश्रमशाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्याध्यापक किरण पोजगे, मुख्याध्यापिका रेणुका मडावी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळेतील झाडाला राखी बांधून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या.

याप्रसंगी श्रीकांत चिंचोलकर यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधन सणाचे महत्त्व व भाऊ-बहीण नात्यातील प्रेम, आपुलकी आणि संरक्षणाची भावना याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापिका रेणुका मडावी यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले.

संचालन राहुल बगवे यांनी तर मनोज बनारसे यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके व सचिव प्रेमलाता पुरके यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# ब्लास्टिंगचे दगड घरांवर कोसळले

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**यवतमाळ :** नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील घाटंजी बायपासच्या कामासाठी करण्यात आलेल्या ब्लास्टिंगमुळे मोठमोठे दगड नागरिकांच्या घरांवर जाऊन पडल्याची घटना बुधवारी घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ब्लास्टिंगपूर्वी नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोप करीत संतप्त नागरिकांनी बायपासचे काम बंद पाडले.

घाटंजी बायपासच्या रस्त्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. रस्त्याच्या कामासाठी खोदकाम करताना संबंधित कंत्राटदाराकडून ब्लास्टिंग करण्यात आले. मात्र, ब्लास्टिंग करण्यापूर्वी परिसरातील नागरिकांना याबाबत कोणतीही सूचना देण्यात आली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अचानक झालेल्या स्फोटामुळे मोठमोठे दगड हवेत उडून थेट नागरिकांच्या घरांच्या दिशेने जाऊन पडले. दगड घरांवर पडल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. घरांच्या परिसरात दगड आढळून आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. यानंतर नागरिकांनी घटनास्थळी एकत्र येत बायपासच्या कामाला विरोध केला आणि काम बंद पाडले. यावेळी नागरिकांनी घरांवर पडलेले दगड दाखवत संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ब्लास्टिंग करताना सुरक्षेच्या उपाययोजना करणे, तसेच परिसरातील नागरिकांना पूर्वसूचना देणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला. ब्लास्टिंगमुळे एखाद्या नागरिकाच्या जीवितास धोका निर्माण झाला असता तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करीत नागरिकांनी सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्याशिवाय काम सुरू करू देणार नसल्याची भूमिका घेतली.

या घटनेमुळे घाटंजी बायपासच्या कामाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधित प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# आदिवासी समुदाय लढवय्याच, अंद्धश्रद्धेला जीवनात थारा देऊ नका- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## अंधश्रद्धा निर्मूलनासाठी डोमा आश्रमशाळेत मुक्काम- उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा विद्यार्थ्यांना संदेश

प्रतिनिधी 3 सप्टेंबर



**अमरावती :** भगवान बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल अशा लढवय्ये व क्रांतिकारी पुरुषांची मोठी परंपरा लाभलेला आदिवासी समुदाय आणि प्रसंगी मेळघाटात वाघ व अस्वलांशी दोन हात करायला न घाबरणारा हा समुदाय आहे. आपली ही लढवय्यी प्रवृत्ती न विसरता अंधश्रद्धेला दूर सारून शिक्षणाची कास व वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून विद्यार्थ्यांनी पुढे जावे, असा मोलाचा संदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी डोमा येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शासकीय आश्रमशाळेत दिला. तसेच सनदी अधिकाऱ्यांनी अंधश्रद्धेला भीक न घालता आयएएस व आयपीएस अधिकारी बनण्याची स्वप्न बघून ती प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करा, असा मौलिक सल्ला दिला.

चिखलदरा तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा डोमा येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सोमवारी, दि. 1 सप्टेंबर रोजीच्या भेटीद्वारे एक अनोखा कार्यक्रम पार पडला. सनदी अधिकाऱ्यांनी प्रशासकीय अधिकाराच्या पलीकडे जाऊन एका पालकाच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांशी रात्रभर संवाद साधत प्रगल्भ विचाराचे दर्शन घडविले. याद्वारे अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर काढत विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी संवेदनशील प्रशासनाचे हे एक अत्यंत धाडसी व भूषणावह पाऊल ठरले.

आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपविभागीय अधिकारी किसन तडवी यांनी संपूर्ण तालुका प्रशासनासह आश्रमशाळेला भेट दिली. आश्रमशाळेत कथित भूत असल्याच्या दाव्याविरुद्ध विज्ञानाची कास धरत अंधश्रद्धेला विरोध करण्याचे व वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन जिल्हाधिकारी व वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी भेटीदरम्यान विद्यार्थ्यांशी या हितगुजावेळी केले.

# अमरावती शहर गुन्हे शाखे मार्फत तडीपार इसमास घातक शस्त्रासह अटक

प्रतिनिधी ३ सप्टेंबर




**अमरावती :** अमरावती शहर गुन्हे शाखे मार्फत तडीपार इसमास घातक शस्त्रासह ताब्यात घेण्यात यश आले आहे.

पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरा मध्ये अवैध्यरित्या घातक शस्त्र बाळगुण दहशत निर्माण करणा-या इसमांवर योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

दिनांक ०१/०९/२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक पोस्टे फ्रेजरपुरा हददीमधे पेट्रोलींग करीत असताना गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, तडीपार इसम श्रवण उर्फ डॉन हा महादेव खोरी येथील मैदाना मध्ये हातामध्ये चाकु घेवुन येणा-या जाणा-या लोकांना धमकावुन दहक्षत निर्माण करीत आहे. सदरची माहती मिळताच गून्हे शाखेचे पथक तत्काळ नमुद ठिकाणी गेले असता तडीपार इसम नामे श्रवण उर्फ डॉन हा हाता मध्ये चाकु घेवुन दिसुन आला त्यास गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने घेराव घालुन जागीच ताब्यात घेतले व त्याचे हाता मधील एक धारदार लोखंडी चाकु कि.अ. १,२००/- रू चे शस्त्र जप्त करून आरोपी विरूध्द पो.स्टे. फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १४२,१३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ताब्यात घेण्यात आलेल्या तडीपार आरोपीचे नाव श्रवण उर्फ डॉन राजेश बनारसे, वय १९ वर्ष. रा. महादेव खोरी, अमरावती. ताब्यात घेण्यात आलेला मुददेमाल एक लोखंडी चाकु कि अं १,२००/- असा एकुण कि.अ. १,२००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखा अमरावती शहर तर्फे सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, तडीपार इसम किंवा शस्त्र घेवुन दहक्षत निर्माण करणारे इसम हे दिसुन येताच नियंत्रण कक्ष अमरावती शहर किंवा गुन्हे शाखा यांना तात्काळ कळवावे माहीती देणा-याचे नाव गूप्त ठेवण्यात येईल. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (परिमंडळ १) यशवंत सोळंके, हुल दुधे आदी यांनी केली आहे




खा. राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या FIR च्या निषेधार्थ व उत्तराखंडमधील भाजप कार्यकर्त्यांविरुद्ध FIR दाखल करण्याच्या मागणीसाठी भाजपा विरोधात निषेध आंदोलन, काँग्रेसचे पदाधिकारी जिल्हाधिकारी वर दाखल, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख आक्रमक, यावेळी काँग्रेस चे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी गाव व ग्रामीण भाग समजून घ्यावा - डॉ. गणेश मुळे

## आयआयएमसीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक वृत्तपत्राचे प्रकाशन

प्रतिनिधी ३ सप्टेंबर




**अमरावती :** पत्रकारितेत बातमी, फिचर,लेख, संपादन आदी बाबी अधिक चांगल्या आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गाव व तेथील संस्कृती, समाजकारण अशा सर्व बाबी समजून ग्रामीण भागाचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी आज येथे केले.

येथील भारतीय जनसंचार संस्थेत (आयआयएमसी) डॉ.मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. आयआयएमसीचे क्षेत्रिय संचालक डॉ. राजेशसिंह कुशवाह, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, माहिती अधिकारी रितेश भुयार, आयआयएमसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, शैक्षणिक सहशिक्षण सहयोगी जयंत सोनोने आणि रोहण तायडे यावेळी उपस्थित होते. संचालक डॉ. मुळे म्हणाले, गाव हा देश व विकासाचा केंद्र बिंदू आहे. त्यामुळे गावाचा परिसर तेथील संस्कृती, समस्या, पर्यावरण त्याला जोडून तेथील समाजकारण आणि राजकारण अशा सर्व बाबी पत्रकारितेचे शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या पाहिजे. गाव व ग्रामीण भागाचा चांगला अभ्यास केल्यानंतर तालुका, जिल्हा, राज्य आणि देश समजू शकतो व पत्रकारितेतील बातमी, फिचर, लेख, संपादन आदी विषय समजू शकतात. वाचन, मनन आणि चिंतनाच्या त्रिसुत्रीचे महत्वही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. प्रभावी शासकीय जनसंपर्क, त्याची विविध साधने आणि बदलत्या काळातील जनसंपर्क त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगितला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी सौदाहरण उत्तरे दिली. तत्पूर्वी, इंग्रजी पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'द पब्लिक एँगल'या प्रायोगिक वृत्तपत्राचे डॉ.मुळे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. मुळे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी जिल्हा माहिती कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर जिल्हा मराठी पत्रकार संघ, श्रमीक पत्रकार संघाला भेट देवून त्यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

# परिवहनेत्तर ( चारचाकी) संवर्गातील नवीन वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरु करण्याबाबत आवाहन

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अमरावती:** परिवहनेत्तर ( चारचाकी) संवर्गातील नवीन वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येत आहे. इच्छुक अर्जदारांनी बुधवार, दि. 8 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 2.30 वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहित शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह अर्ज परिवहन कार्यालय, कॅम्प, अमरावती, खिडकी क्रमांक -25 येथे जमा करावेत,असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले आहे.

वाहन ज्याच्या नावावर असेल त्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत त्यांच्या पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड जोडावे. तसेच अर्जामध्ये वाहन ज्या व्यक्तीच्या नावे आहे, त्या व्यक्तीचा आधारकार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक डिमांड ड्राफ्ट अमरावती, कॅम्प ब्रांच, ट्रेझरी ब्रांच कोड नं 003866 साठी देय असावा.एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल, त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील, त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी दि. 8 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 4 वाजता कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमांकासाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशाच अर्जदारांनी 9 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 1.30 वाजेपर्यंत त्या क्रमांकासाठी पसंती क्रमांक शुल्काच्या डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त जादा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात सीलबंद करून खिडकी क्रमांक -25 वर जमा करावे.

एकाच पसंतीक्रमांकासाठी दोन किंवा दोनापेक्षा जास्त अर्ज प्राप्त होऊन सिलबंद लिफाफ्यात सादर केलेल्या जादा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट धारकांनी 9 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 3 वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात उपस्थित रहावे. लिलावासाठी उपस्थित राहणा-या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकार पत्रासह हजर रहावे. कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा ड्राफ्ट सादर केला असेल, त्याला तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा ड्राफ्ट संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल. तसेच, विहित वेळेत अनुपस्थित अर्जदारांचा कुठलाही प्रकारचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पसंती क्रमांकासाठी कोणत्याही अर्जदारास दुरध्वनी, भ्रमणध्वनी अथवा एसएमएस केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# युवा स्वाभिमान पार्टीची ऐतिहासिक दहीहंडी रद्द!

## आ. रवी राणा यांची पत्र परिषदेमध्ये माहिती; डफरीन दुर्घनेतील पीडितांसाठी ५० लाखांची मदत

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**अमरावती :** संपूर्ण विदर्भातील जनतेसाठी आकर्षण असणारी तसेच पारंपारीक व संस्कृती जपणारी युवा स्वाभिमान पार्टीची ६ सप्टेंबर रोजीची होणारी ऐतिहासिक दहिहांडी रद्द करण्यात आली आहे. ही रक्क्म सामाजिक बांधीलकी जोपासत अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील झालेल्या दुदैवी घटनेला समर्पित करुन सर्वप्रथम घटनेतील मृत्यू झालेल्या बालकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक बालकाला दोन लाखांची मदत देण्यात आल्याची माहिती आज युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यालयात पार पडलेल्या पत्र परिषदेमध्ये आ. रवी राणा यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत झालेल्या चर्च वरून व माजी खासदार व भाजपा नेत्या नवनित रवि राणा यांनी पत्राव्दारे केलेल्या विनंतीनुसार नवाथे चौक, अमरावती सह परतवाडा, धारणी, अंजनगाव सुर्जी व तिवसा येथील सर्व दहिहांडी कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. ६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता नवाथे चौक येथे दहिहांडीची परंपरा कायम ठेवत अत्यंत साध्या पध्दतीने कोणताही गाजावाजा न करता बालगोपालांच्या हस्ते भगवान श्रीकृष्ण यांचे पूजन करुन दहिहांडी फोडणार तसेच बाल गोपालांचा आनंद कायम ठेवत राधा-कृष्ण सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्यावतीने जिल्हा स्त्री रुग्णालयातील घडलेल्या दुर्घटनेतील पीडितांना आर्थीक मदतीसह ५० लाखांचा निधी सामाजिक उपक्रमासाठी समर्पित करण्यात येणार आहे.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील झालेल्या दुदैवी दुर्घटनेतील पुजा स्वाती बोरंगे, गायत्री प्रफुल चोपडे, किरण गंगाराम बेठेकर यांच्या कडील शिशु दगावले त्यांचे घरी आमदार रवी राणा व माजी खासदार भाजपा नेत्या नवनीत राणा हे स्वतः जावून कुटुंबाला प्रत्येकी २ लाख रुपये आर्थिक मदत देणार तसेच दुर्घटनेत जखमी झालेल्या बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत व परीवारातील महिलांना शिलाई मशिन वाटप करण्यात येईल.

# व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय वसतिगृह प्रवेशास 15 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अमरावती:** इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळवण्यासाठी 15 ऑक्टोबर 2026 पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदत वाढ देण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अमरावती कार्यालयाने शैक्षणिक वर्ष 2026-27 साठीचे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. 12 वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनिवार्य आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत जिल्ह्यात कार्यरत मुला-मुलींच्या वसतिगृह योजनेनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत सोई –सुविधा पुरविण्यात येतात. जिल्ह्यातील 12 वी नंतर व्यावसायिक व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी https://hmas.mahait.org संकेत स्थळावर येत्या 15 ऑक्टोबर पर्यंत अर्ज करता येणार आहे. हा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कालमर्यादित मुलांनी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक एच, राम लक्ष्मण संकुल, दुसरा माळा, रामपुरी कँप अमरावती येथे तर मुलींनी बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक ए, राम लक्ष्मण संकुल, तिसरा माळा, रामपुरी कँप अमरावती या वसतीगृहांमध्ये सादर करावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण अमरावतीच्या सहायक संचालक सरिता बोबडे यांनी केले आहे.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांनी hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह वरील दिलेल्या दिनांकापर्यंत सादर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, (पोलीस आयुक्तालयाच्या मागे) येथे तसेच adobbwoamravati@gmail.com वर ईमेल करता येणार आहे.

# राजापेठ येथे रंगणार भव्य गणेश आगमन सोहळा

## जगन्नाथ पुरी धाम देखाव्यासह वाघांचे विशेष आकर्षण

प्रतिनिधी ३ सप्टेंबर




**अमरावती:** शहीद भगतसिंग मंडळ, राजापेठ, अमरावतीतर्फे यंदाचा गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, ३ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य गणेश आगमन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावर्षी मंडळाकडून 'जगन्नाथ पुरी धाम' हा भव्य देखावा साकारण्यात आला असून, अमरावतीत प्रथमच वाघांच्या आगमन सोहळ्याचे विशेष आकर्षण राहणार आहे.

या सोहळ्यास आमदार रवी राणा व खासदार नवनीत राणा यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती मंडळातर्फे देण्यात आली आहे.

राजकमल चौक येथे दुपारी ४ वाजल्यापासून आगमन सोहळ्याला सुरुवात होणार आहे. यामध्ये उज्जैन येथील भोले बाबांची अघोरी बारात, रायपूर येथील वाघांचा थरारक अवतार, तसेच छत्तीसगड दुर्ग येथील प्रसिद्ध गौरी कृपा धुमाल आणि अमरावतीच्या शान वैभव धुमाल यांची विशेष प्रस्तुती पाहायला मिळणार आहे.

यासोबतच अमरावतीतील प्रसिद्ध स्वराज्य ढोल-ताशा पथक, आकर्षक लाईट शो, फायर शो आणि भव्य आतषबाजी हेही सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असणार आहे. विविध प्रकारच्या धार्मिक झांक्यांसह हा आगमन सोहळा राजापेठ परिसरात रंगणार आहे.

सुमारे रात्री ८ वाजता विविध आकर्षणांसह पायदळ मिरवणुकीने गणेश आगमन सोहळ्याची सांगता होणार आहे.

# पीएम सुर्यघर योजनेमुळे जिल्ह्यात सौर क्रांती

## जिल्ह्यातील ४३ हजार वीज ग्राहकांच्या घरांवर होत आहे १७१ मेगावॅट वीज निर्मिती

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अमरावती:** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला अमरावती जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्याची वाटचाल सौर क्रांतिच्या दिशेन होत आहे. जिल्ह्यातील ४३ हजार १४८ वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत घराच्या छतावर सौर प्रकल्प बसविला असून या प्रकल्पाच्या माध्यमातून १७१ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. अशी माहिती अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली आहे.

दरमहा तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेत अमरावती जिल्ह्याअंतर्गत महावितरणच्या अचलपूर विभागात ७ हजार ८८८ ग्राहकांनी ३०.५० मेगावॅट, अमरावती ग्रामीण विभागातील ५ हजार ३३९ ग्राहकांनी २०.२५ मेगावॅट, मोर्शी विभागातील ५ हजार ९९९ ग्राहकांनी २३.३० मेगावॅट आणि अमरावती शहरातील २३ हजार ९४२ ग्राहकांनी ९६.९७२ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घराच्या छतावर उभारले आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे संच बसवणाऱ्या वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या संचासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल जवळपास शून्य होते तसेच अतिरिक्त निर्माण झालेली वीज, विजबिलात समायोजित करण्यात येते.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी ग्राहकांना लागणारे सोलर नेट मीटर महावितरणकडून विनामूल्य पुरवण्यात येत आहेत. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळते. त्यानुसार त्यांना वीजबिल कमी करण्यासाठी नियोजन करता येत आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना www.pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. महावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे.

> घरांच्या छतावर सौर यंत्रणा बसवून वीज ग्राहकांना आपले वीजबिल शुन्यापर्यंत कमी करता येते,प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना www.pm-suryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. तसेच वीज ग्राहकांना महावितरणकडून संपूर्ण सहकार्य करण्यात येणार.
>
> **दिलीप दोडके** , मुख्य अभियंता
> महावितरण अमरावती परिमंडळ

त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत 'फेसलेस' व 'पेपरलेस' पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे.




सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि. २१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
पोलीस प्रशासन 'ॲक्शन मोडवर' गुटखा माफिया रडारवर!
मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
प्रशासनाचे अभय, गुटखा माफियाचा 'विजय'
बंदी असूनही बिनधास्त विक्री,
मुजोर माफियांना वरदहस्त कोणाचा!
वाशीम ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत...
अवैध गुटखा
वाहन चालकाला फटका,
मुख्य सूत्रधाराची सुटका!
गुटखा आणि वाहन असा ९ लाख ७४ हजारांचा मुद्देमाल जप्त...
सिटी न्यूज सुपरफास्टचा दणका...
गुटखा तस्करी पुन्हा पुन्हा,
तापडियावर दाखल झाला गुन्हा!
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुटखा माफियावर कारवाई कब, रिसोड बनले 'गुटखा हब'!
कारवाईचे सत्र, मोक्का लावण्याचे पत्र!
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रिसोड गुटखा प्रकरण; २० दिवसानंतरही अटक न करण्याचे धोरण
आरोपी तापडिया फरार,
अटक न करण्याचा करार!
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुटखा तस्करी प्रकरणात...
आरोपी तापडीया फरार,
तरी रिसोडात सुरू व्यापार!
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुटखा तस्कर तापडिया प्रकरण...
असे काय घडले; घटनास्थळच बदलले!
*१ महिना उलटला, आरोपी नाही सापडला * वाशीम ग्रामीण पोलीस पुन्हा संशयाच्या भोवऱ्यात

## गुटखा तस्कराचा शोध थातूर-मातूर...

# तापडिया चतूर, पोलीस फितूर!

• नाजीर शेख @ वाशीम •

वाशीम ग्रामीण पोलिसांकडून अवैध गुटखा तस्करीविरोधात झालेल्या कारवाईनंतर या प्रकरणातील मुख्य सूत्रधार विजय तापडिया अद्यापही फरार आहे. पोलीस त्याच्या मागावर असून तो पोलीसांना सापडत नाही आहे. गुटख्याचे अनेक गुन्हे दाखल असतांना आता पर्यंतच्या सर्व गुन्ह्यात त्याने अटक पूर्व जामीन मिळवला आहे. या गुन्ह्यात देखील तो अटक पूर्व जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. तब्बल महिन्याभरापासून वाशिम ग्रामीण पोलीस आरोपीला पकडण्यासाठी रिसोड येथे चकरा मारत आहे. मात्र वाशिम येथून पोलिसांची गाडी तापडियाला पकडण्यासाठी निघाली की, रिसोड पोलीस ठाण्यातील एक फितूर कर्मचारी वाशिम ग्रामीण पोलिसांची दिशाभूल करून आरोपीला पळवून देत असल्याची चर्चा आहे.



१ ऑगस्ट रोजी वाशिम ग्रामीण पोलिसांनी गुटख्याने भरलेले एक वाहन जप्त केले होते. या कारवाईत वाहनासह गुटखा असा एकूण ९ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी रिसोड येथील मुख्य गुटखा तस्कर विजय तापडिया व चालक रुपेश ताराचंद पवार यांच्याविरुद्ध वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी चालक रुपेश पवार याला अटक करण्यात आली असून तो सध्या जिल्हा कारागृहात आहे. दरम्यान, त्याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. तर मुख्य आरोपी तापडिया अटक पूर्व जामीनसाठी प्रयत्न करत आहे. या संदर्भात दैनिक सिटी न्यूज सुपरफास्टने या प्रकरणाची वृत्तमालिका लावून धरली आहे. कारवाई झाल्यापासून आरोपी तापडिया फरार असला तरी त्याचा गुटखा व्यवसाय रिसोडच्या मोहजा इंगोले येथून सुरळीत सुरू असल्याची माहीती आहे. मात्र रिसोड पोलीस त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांमधून केला जात. या गुटखा कारवाईला तब्बल एक महिना उलटला असून मुख्य आरोपी हा अजून मोकाट आहे. तो अजूनही रिसोड पोलिसांच्या संपर्कात असून तेथील एका 'विनोद' सोबत त्याचे अनेक वेळा गुप्त बैठका झाल्या आहेत आहे. वाशिम ग्रामीण पोलीस रिसोडला येण्याआधी त्या 'विनोद'ला संपर्क करतात. ती माहिती थेट मुख्य गुटखा तस्कर तापडिया पर्यंत पोहचते. त्यामुळे आरोपी ग्रामीण पोलिसांच्या हाती लागत नसल्याची माहिती आहे.

*** १ महिना उलटूनही, पोलिसांचे हात खाली.**
*** आरोपी तापडिया दिसल्यास पोलिसांना संपर्क करा.**
*** वाशीम ग्रामीण पोलिसांचे आवाहन.**

एक प्रकारे रिसोड पोलीस ठाण्याचे फितूर कर्मचारी ग्रामीण पोलिसांची दिशाभूल करून आरोपी तापडियाला थेट मदत करत असल्याचा आरोप नागरिकामधून केला जात आहे. त्यामुळे या आरोपीला अटक करण्यासाठी एक सक्षम तपास अधिकारी नियुक्त करण्याची मागणी केली जात आहे. आरोपी तापडियाला अटक करण्यासाठी वाशिम ग्रामीण पोलीस, रिसोड पोलीस तसेच वाशिम स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्याच्या मागावर आहे. आरोपी हा वारंवार चकमा देवून पडून जाण्यात यशस्वी होत असून कोणालाही आरोपी तापडिया दिसल्यास तात्काळ कळविण्याचे आवाहन वाशिम ग्रामीण पोलिसांनी केले आहे. मात्र आता तरी आरोपी हा गजाआड होणार की, अटक पूर्व जामीन मिळविणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## थोडक्यात

### महावीर रुगवाल यांच्या कावड यात्रेने भाविकांचे लक्ष वेधले

• सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार •

श्रावण महिन्यातील पावन पर्वावर राज्यभर कावड यात्रेचा उत्साह शिगेला पोहोचला असताना शेलूबाजार परिसरातही धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. विविध धार्मिक कार्यक्रमांसह कावड यात्रांमध्ये भाविकांचा मोठा सहभाग दिसून येत आहे. अशाच उत्साहपूर्ण वातावरणात शेलूबाजार येथील महावीर मदनलालजी रुगवाल यांनी एका आगळ्यावेगळ्या आणि पारंपरिक कावड यात्रेद्वारे भाविकांचे लक्ष वेधून घेतले आहे.



श्रावण महिन्यातील धार्मिक उत्सवात महादेवाच्या भक्तीचा अनोखा रंग पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी कावड यात्रांचे आयोजन होत असले तरी महावीर रुगवाल यांची कावड यात्रा श्रद्धा, परंपरा आणि धार्मिकतेचा अनोखा संगम ठरत आहे. गतवर्षाप्रमाणे यंदाही त्यांनी मध्य प्रदेशातील सिहोर येथून दर्शन घेऊन कावड यात्रेला प्रारंभ केला. श्रावणातील विविध सोमवारी ही यात्रा विविध शिवमंदिरांमध्ये पोहोचणार आहे. यात्रेदरम्यान भाविकांमध्ये भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिकता ही केवळ मंदिरापुरती मर्यादित न राहता प्रत्येकाच्या जीवनात श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी असते. पवित्र जल घेऊन विविध देवस्थानांमध्ये दर्शन व पूजा-अर्चना करण्याची कावड यात्रेची परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने जपली जात आहे. महावीर रुगवाल यांच्या या आगळ्यावेगळ्या कावड यात्रेमुळे शेलूबाजार परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, श्रावणातील शिवभक्तीचा उत्सव अधिकच उत्साहपूर्ण बनला आहे.

### महसुली प्रकरणांच्या जलद निपटाऱ्याला आता लोक अदालतीची साथ

• सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार •

महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा जलदगतीने व्हावा आणि पक्षकारांना दीर्घकाळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेतून दिलासा मिळावा, यासाठी राज्यात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येणारे हे अभियान महसूल प्रकरणांच्या जलद निपटाऱ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

महसूल विभागातील अनेक प्रकरणे विविध स्तरांवरील न्यायालयांमध्ये प्रलंबित असतात. अशा प्रकरणांमध्ये पक्षकारांना वेळ, श्रम आणि आर्थिक खर्चाचा सामना करावा लागतो. अनेकदा परस्पर संमतीने व तडजोडीने प्रश्न सुटण्याची शक्यता असतानाही प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. ही बाब लक्षात घेऊन पक्षकारांच्या संमतीने तडजोडीच्या माध्यमातून प्रकरणे निकाली काढण्यावर या अभियानात भर देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल प्रशासनातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करून पक्षकारांना वेळेत दिलासा देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे. या अभियानात मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयांतील प्रलंबित महसुली दावे व अपीलांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे महसूल प्रशासनातील विविध स्तरांवर प्रलंबित असलेल्या प्रकरणांना या उपक्रमाच्या माध्यमातून एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. अभियानाच्या कालावधीत दर तीन महिन्यांनी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. संबंधित प्रकरणांमध्ये पक्षकारांची परस्पर संमती झाल्यास तडजोडनामा करण्यात येईल. त्यानंतर अंतिम आदेशाद्वारे प्रकरणे कायमस्वरूपी निकाली काढण्यात येणार आहेत. त्यामुळे केवळ प्रकरणांचा निपटारा होणे एवढेच नव्हे, तर पक्षकारांच्या सहमतीने वादाला अंतिम स्वरूप देण्याची संधी मिळणार आहे.

## कारंजा तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती...

# मदतीसाठी स्वाभिमानी जमिनीत गाडून घेत केले आंदोलन!

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

तालुक्यात मागील एक महिन्यापासून पावसाचा खंड पडल्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. खरिपाची पिकं पूर्णतः सुकून गेली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत जाहीर करावी या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामूअण्णा इंगोले आणि हर्षद पारे यांनी येवता परिसरात स्वतःला जमिनीत गाडून घेत आंदोलन केले.

कारंजा तालुक्यासाठी संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेला असून २०३ मिलिमिटर पाऊस अपेक्षित असतांना केवळ १५ मिलमीटर पाऊस झाला आहे. हा पाऊस सरासरीच्या केवळ ७ टक्के इतका आहे. तालुक्यातील सहाही मंडळात पावसा अभावी सोयाबीन, तूर, कापूस सर्वच पिकं वाळून गेले आहेत. याचा सर्वाधिक फटका कमरगाव मंडळाला बसला असून या मंडळात केवळ २ मिलिमिटर पावसाची नोंद झाली आहे. मात्र इतकी गंभीर परिस्थिती असतांनाही प्रशासनाकडून अद्याप कोणतेही पावलं उचलली गेली नाहीत त्यामुळे संतप्त झालेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांडून स्वतःला जमिनीत गाडून घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. कारंजा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी आणि पीकविमा देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनावेळी शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. त्यांच्याकडुन सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली.



## हेक्टरी १ लाख रुपये मदत देण्याची मागणी

# जिल्हाधिकाऱ्यांची मंगरुळपीर तालुक्यात कृषी उपक्रमांची पाहणी

***आधुनिक शेती तंत्रज्ञान, फळबाग व्यवस्थापन व पीक विविधीकरणाची घेतली माहिती**
***हवामान अनुकूल शेतीसह मूल्यवर्धनाला चालना**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

हवामानातील बदलांना सामोरे जात शेती अधिक शाश्वत आणि उत्पादनक्षम करण्यासाठी शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या विविध प्रयोगांची जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मंगरुळपीर तालुक्यात प्रत्यक्ष पाहणी केली. विविध गावांना भेट देऊन कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधून हवामान अनुकूल शेती, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक विविधीकरण, फळबाग व्यवस्थापन आणि शेतमालाचे मूल्यवर्धन याबाबत माहिती जाणून घेतली.



# पांढरा हत्ती उद्घाटनाच्या प्रतीक्षेत!

## लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी लक्ष देखील का?

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

कारंजा शहरातील गेल्या चार वर्षापासून सुरू असलेले प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन सुद्धा ही इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे.

सविस्तर माहिती अशी की कारंजा तालुक्याच्या ठिकाणी शासकीय कार्यालयाच्या इमारती या वेगवेगळ्या ठिकाणी असून त्या फार जुन्या आहेत त्या अनुषंगाने दिवंगत आमदार राजेंद्र पाटणी यांनी त्यांच्या कार्यकाळात एका मोठ्या प्रशासकीय इमारतीची मान्यता आणून त्यांच्याच कार्यकाळात म्हणजे मार्च २०२२ ला इमारतीचे बांधकाम सुरू झाले होते. कारंजा शहरात वेगवेगळ्या ठिकाणी असलेले शासकीय कार्यालय व त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आपले काम करण्यासाठी होणारा त्रास व वेळ वाचावा यासाठी एकाच छताखाली



शासकीय कार्यालय असावे हा उद्देश आमदार राजेंद्र पाटणी यांचा होता. परंतु आज चार वर्ष उलटून व १० कोटी ५० लाख खर्च होऊन सुद्धा ही इमारत पांढऱ्या हत्ती सारखी उद्घाटनाच्या प्रतीक्षेत उभी आहे. या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, कृषी कार्यालय असे विविध कार्यालय एका इमारतीमध्ये येणार आहे. या इमारतीचे उद्घाटन या वर्षी २६ जानेवारीला होणार अशी माहिती होती. परंतु तेव्हाही झाले नाही नंतर १५ ऑगस्टला होणार अशी माहिती मिळाली परंतु १५ ऑगस्ट सुद्धा निघून गेला तरी ही इमारत उद्घाटनाची वाट पाहत आहे.

# पाऊस गायब, पिके बेहाल; कोरडा दुष्काळ जाहीर करा!

***द्या मदतीचा आधार - पुरुषोत्तम जाधव * संघर्ष संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

• सिटी न्युज ब्युरो @ केनवड •

पावसाने पाठ फिरवल्याने वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ऑगस्ट महिन्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने कोरडवाहू क्षेत्रातील सोयाबीन पिके सुकू लागली आहेत. सध्या सोयाबीन शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाअभावी उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाशिम जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी संघर्ष संघटनेने केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. वाशिम जिल्हा आकांक्षी जिल्हा असून जिल्ह्यातील बहुतांश नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. जिल्ह्यात सिंचनाच्या मोठ्या सुविधा नसल्याने शेती मोठ्या प्रमाणावर मोसमी आणि परतीच्या पावसावर अवलंबून आहे. यंदा ऑगस्ट महिन्यात पाऊस न झाल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः सोयाबीन पीक शेंगा भरण्याच्या अवस्थेत असल्याने यावेळी पावसाची मोठी गरज आहे. मात्र, पाऊस न झाल्याने काही भागातील पिके सुकत आहेत.



शेतकऱ्यांनी पिकांच्या लागवडीपासून आतापर्यंत मोठा खर्च केला आहे. आता पाऊस झाला तरी अनेक शेतकऱ्यांचा केलेला खर्चही निघणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. शासनाच्या दुष्काळ जाहीर करण्याच्या नियमावलीतील निकषांचा विचार करता सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन वाशिम जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा.

तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शेतकरी संघर्ष संघटनेची ही मागणी तात्काळ पूर्ण न झाल्यास शासन व प्रशासनाला पूर्वसूचना देऊन जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. आंदोलनानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकरी संघर्ष संघटनेचे पुरुषोत्तम जाधव यांनी ही मागणी केली आहे.

# शिक्षक संघटनांच्या आरोपांची निःपक्षपाती चौकशी करा!

## चौकशीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची (शिवसेना उबाठा) पक्षाची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीम जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांनी दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनातील गंभीर आरोपांची तातडीने, वस्तुनिष्ठ व निःपक्षपाती चौकशी करण्यात यावी, तसेच चौकशीच्या कालावधीत संबंधित अधिकारी श्री. गजानन उत्तमराव डाबेराव यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

वाशिम जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांनी एकत्रितपणे श्री. गजानन उत्तमराव डाबेराव, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती मंगरूळपीर तथा प्रभारी गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती वाशिम यांच्या कार्यपद्धतीबाबत



गंभीर स्वरूपाच्या तक्रारी व आक्षेप नोंदविले आहेत. या संदर्भातील निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मा. श्री. बालाजी पाटील वानखेडे तसेच मंगरूळपीर तालुकाप्रमुख मा. श्री. अर्जुन भीमराव पाटील सुर्वे यांना प्राप्त झाले होते. याची तत्काळ दखल घेत शिवसेनेचे जिल्हा प्रमुख बालाजी पाटील वानखेडे, उप जिल्हाधिकारी सचिन परळीकर, तालुका प्रमुख अर्जुन भीमराव पाटील सुर्वे, भागवत शिंदे, राम सावके, ओमप्रकाश इंगळे, आनंदा काळे, शंकर सावके, पंढरी भोयर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन शिक्षकांच्या समस्या त्यांना सांगितल्या. जिल्ह्यातील तब्बल १८ शिक्षक संघटनांनी एकत्र येऊन विविध मुद्द्यांवर तक्रारी व गंभीर आरोप मांडले असल्याने या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक, निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे शिवसेनेने निवेदनात म्हटले आहे. शिक्षक संघटनांनी केलेल्या आरोपांची सत्यता चौकशीतून स्पष्ट करण्यात यावी आणि आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार योग्य ती प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. चौकशी निष्पक्ष व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी चौकशीच्या कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अन्यथा संबंधित अधिकारी चौकशी प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे शिवसेना पक्षाने म्हटले आहे. दरम्यान, शिक्षक संघटनांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास ७ सप्टेंबर २०२६ रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक संघटनांनी दिला आहे. शिक्षकांच्या न्याय्य मागण्या आणि त्यांच्या सन्मानाच्या प्रश्नासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष शिक्षकांच्या आंदोलनात ताकदीने सहभागी होईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# निवृत्त शिक्षकाची मनमानी, खोट्या तक्रारीद्वारे बदनामी!

## अक्षय बेंद्रे यांची पोलिस अधीक्षकांकडे तक्रार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम शहरातील निवृत्त शिक्षक लक्ष्मण प्रल्हाद वानखेडे यांनी आपली जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या उद्देशाने खोटे आरोप करून तक्रार दाखल केल्याचा आरोप तक्रारदार अक्षय गोवर्धन बेंद्रे यांनी केला आहे. शिक्षक वानखेडे यांनी अक्षय बेंद्रे सह अनेकांना खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचे तक्रारीत म्हटले आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली आहे.

अक्षय बेंद्रे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, आपला संबंधित प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना


जमीन व्यवहारात निवृत्त शिक्षकांची फसवणूक...
उघडकीस आला एक, प्रकार घडले अनेक!

जाणीवपूर्वक आपले नाव तक्रारीत गोवण्यात आले. खोटे व बनावट आरोप करून सामाजिक प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, तसेच आपल्याला न्याय मिळावा, अशी मागणी अक्षय बेंद्रे यांनी पोलिस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# अकोला मनपाला मिळणार 9.88 कोटी रुपये...!



प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला :** राज्य सरकारने मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी तब्बल २ हजार ७९२ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) हिश्श्याच्या अनुदानातील प्रलंबित निधीला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. यासंदर्भात नगरविकास विभागाने शासन आदेश जारी केला आहे.

या निधीतून अकोला महानगरपालिकेला ९ कोटी ८८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. गेल्या काही काळापासून आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या मनपासाठी हा निधी मोठा दिलासा मानला जात आहे. महापालिकेच्या तिजोरीत निधी उपलब्ध झाल्याने प्रशासनावरील आर्थिक ताण काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, निधीअभावी रखडलेल्या विविध कामांना आता गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरातील विकासकामांसाठी महापालिकेला सातत्याने निधीची आवश्यकता भासत आहे.

मात्र, उपलब्ध निधीच्या मर्यादेमुळे अनेक कामांना विलंब होत असल्याचे चित्र आहे. त्यातच कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते आणि कंत्राटदारांची देयके यांचा आर्थिक भार मनपावर आहे.

## कंत्राटदारांच्या थकीत बिलांना प्राधान्य?

अकोला शहरात विविध विभागांतर्गत अनेक विकासकामे सुरू आहेत. काही कामे पूर्ण झाली असली तरी संबंधित कंत्राटदारांची बिले अद्याप प्रलंबित असल्याची स्थिती आहे. थकीत देयकांमुळे नवीन कामे हाती घेण्यासही अडचणी निर्माण होतात. त्यामुळे उपलब्ध निधीतून कंत्राटदारांची प्रलंबित बिले अदा करण्यास प्राधान्य दिल्यास विकासकामांना चालना मिळू शकते. कामांची बिले वेळेत मिळाल्यास कंत्राटदारांकडूनही रखडलेली कामे पूर्ण करण्यास गती मिळण्याची शक्यता आहे.

## रस्ते सुधारणांना मिळणार चालना?

अकोला शहरातील रस्त्यांचा प्रश्न सातत्याने चर्चेत असतो. शहरातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात खड्डयांमुळे नागरिकांच्या अडचणी आणखी वाढतात. रस्ते दुरुस्ती आणि डांबरीकरणासाठी मोठ्या निधीची गरज असते. नवीन निधी उपलब्ध झाल्याने रस्ते सुधारणा कामांना काही प्रमाणात गती मिळण्याची शक्यता आहे. मात्र, त्यासाठी निधीचे योग्य नियोजन आणि प्राधान्यक्रम निश्चित करणे आवश्यक ठरणार आहे.

## नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या

शासनाकडून निधी मंजूर झाल्याची माहिती समोर आल्यानंतर शहरवासीयांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. केवळ निधी मंजूर होणे पुरेसे नसून त्याचा प्रत्यक्ष परिणाम शहराच्या विकासात दिसून यावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. त्यामुळे आता खरा प्रश्न निधी मिळाला का, हा नसून “मिळालेल्या निधीतून अकोला शहराचा विकास किती वेगाने होणार?” हा आहे.

## कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटणार?

महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा मोठा खर्च प्रशासनाला दर महिन्याला करावा लागतो. याशिवाय सफाई कामगार, कंत्राटी कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या देयकांचाही भार मनपावर असतो. निधीअभावी काही देयके प्रलंबित राहण्याची शक्यता असते. शासनाकडून मिळालेल्या निधीतून प्रलंबित वेतन व विविध भत्ते अदा करण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे मनपा कर्मचाऱ्यांनाही या निधीमुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र त्यासाठी निधीचे योग्य नियोजन आणि प्राधान्यक्रम निश्चित करणे आवश्यक ठरणार आहे. तसेच कत्रांटदारांकडूनही रखडलेली कामे पूर्ण करण्यास गती मिळण्याची शक्यता आहे.

### व्यापारी दरोडा प्रकरणात आरोपी गजाआड

# कामगारच निघाला कटाचा खरा सूत्रधार

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**अकोला :** शहरातील मोहता मिल रोड परिसरात वृद्ध व्यापारी व त्यांच्या पत्नीला लोखंडी कोयत्याचा धाक दाखवून हातपाय बांधत २६ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लुटून नेणाऱ्या टोळीला एलसीबीने ४८ तासात जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपीसह एका संशयिताला ताब्यात घेत ३३ लाख ६२ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये २०८.९३७ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि २ लाख २८ हजार १०० रुपये रोख रकमेचा समावेश आहे.

विजयकुमार रामकरणदास गुप्ता (६७), रा. चिरणिया कम्पाऊंडसमोर, मोहता मिल रोड यांनी रामदासपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ते घरातील ढेपेच्या गोदामात काम करीत असताना काही इसमांनी गोदामात प्रवेश केला. आरोपींनी विजयकुमार गुप्ता व त्यांच्या पत्नीला लोखंडी कोयत्याचा धाक दाखवून मारहाण केली आणि हातपाय बांधून कपाटातील २२४ ग्रॅम सोन्याचे दागिने व ४ लाख ५० हजार रुपये रोख असा अंदाजे २६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून पसार झाले. तपासादरम्यान फिर्यादीच्या दुकानात मागील चार वर्षांपासून काम करणारा सलीमखान गुलखान, रा. मुजफ्फर नगर, नया बैदपुरा, अकोला याच्या हालचाली संशयास्पद आढळून आल्या. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

सलीमखान गुलखान याने त्याचे सहकारी मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा ऊर्फ राजा ऊर्फ गंगा आणि एका अज्ञात साथीदारासोबत कट रचला. फिर्यादीच्या घरातील व्यवहार व परिस्थितीची माहिती देत त्याने साथीदारांना चोरी करण्यास मदत केल्याचे तपासात समोर आले. दरम्यान, मुख्य आरोपी मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा ऊर्फ राजा ऊर्फ गंगा हा चोरीचा मुद्देमाल घेऊन अकोल्यातून फरार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

आरोपी हैदराबादला गेल्याची गोपनीय माहिती मिळताच पथक तिथे पोहोचले. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे विविध लॉजची तपासणी करण्यात आली. अखेर आरोपी एका लॉजमध्ये लपून बसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी छापा टाकून मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा ऊर्फ राजा याला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या चौकशीत आरोपीने सलीमखान गुलखान व एका अज्ञात साथीदारासोबत पूर्वनियोजित कट रचून व्यापारी व त्यांच्या पत्नीवर कोयत्याचा धाक दाखवत जबरी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीच्या मुद्देमालातील काही भाग अज्ञात साथीदाराने घेऊन गेल्याची माहितीही तपासात समोर आली आहे. ही कारवाई एसपी अर्चित चांडक, एएसपी बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पीआय नितीन लेव्हरकर, एपीआय गोपाल जाधव, पीएसआय अनिल चव्हाण, शेख हसन, फिरोजखान, वसीमोद्दीन, भास्कर धोत्रे, किशोर सोनुने, अब्दुल माजिद, सुलतान पठाण, महेंद्र मलीये, रवि खंडारे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, श्रीकांत पातोंड, धिरज वानखडे, आकाश मानकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, अशोक सोनवणे, सतीश पवार, विनोद ठाकरे, प्रकाश लोखंडे यांनी केली.

## जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी नागरिकांचा त्रास आता संपणार

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**अकोला:** महापालिकेत जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी सामान्य जनतेची होणारी पायपीट थांबवण्यासाठी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. त्यांनी थेट विभागात जात आढावा बैठक घेऊन कामे वेगाने करण्याचे आदेश दिले. अकोला महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात दाखल्यांसाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. या समस्येची गंभीर दखल घेत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी स्वतः थेट जन्म-मृत्यू विभागात धडक दिली. तिथे उपस्थित अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेत त्यांनी कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. 'सामान्यांना एका दाखल्यासाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागू नये आणि त्यांच्या तक्रारी शून्य झाल्या पाहिजेत,' अशा कडक शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. तसेच, शासकीय कामाचा दर्जा टिकवून कामाचा स्पीड तात्काळ सुधारण्याचे स्पष्ट आदेश दिले. सभापतींच्या या धडक कारवाईमुळे महापालिका प्रशासनात खळबळ उडाली असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## आयुष्मान जनआरोग्य योजनेत जिल्हा 'टॉप 10 ' मध्ये

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला.** प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत जिल्ह्यात ५३ टक्के नोंदणी झाली असून, जिल्ह्याचा राज्यात पहिल्या १० क्रमांकामध्ये समावेश आहे. नागरिकांच्या आरोग्य संरक्षणासाठी ही योजना महत्त्वपूर्ण असून, १०० टक्के नोंदणी होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या जिल्हास्तरीय संनियंत्रण व तक्रार निवारण समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, माता व बालसंगोपन अधिकारी विनोद करंजीकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती, योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ. शीतल गावंडे, डॉ. पंकज बोरकर, तसेच योजनेत अंगीकृत रूग्णालयांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

# धक्काबुक्कीत मजुराचा मृत्यू

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला.** एमआयडीसी मधील एका डाळ मिलमध्ये किरकोळ वादाचे पर्यवसान मजुराच्या मृत्यूत झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. दारूच्या नशेत झालेल्या वादानंतर धक्काबुक्कीत मजूर गंभीर जखमी होऊन खाली कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर हा प्रकार लपविण्यासाठी मृतदेह डाळमिल परिसरातून ओढत नेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बलराम, हिरालाल, दिनकर हे अंकुर उद्योग मध्ये मजूर म्हणून काम करीत होते. २ च्या रात्री सुमारे ९ ते १० वाजताच्या दरम्यान ते जेवण करून बसले होते. याचवेळी मगन धांडे याच्यासोबत त्यांचा वाद झाला.दारूच्या नशेत शिवीगाळ केल्याने वाद अधिकच चिघळला. संतापलेल्या मगनने बलराम यांच्याशी धक्काबुक्की केली. यावेळी बलराम हे बाजूला असलेल्या लाकडाच्या ढिगाऱ्यावर जोरात आदळले. त्यांच्या तोंडाला आणि मानेला गंभीर दुखापत झाली. या दुखापतीतच त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. तपासादरम्यान एमआयडीसी पोलिसांनी दालमिलचे मालक व व्यवस्थापक श्याम कापसेयांना डीव्हीआरसह पोलीस ठाण्यात बोलावले. पंचांसमक्ष सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. फुटेजमधील व्यक्ती मगन धांडे असल्याचे व्यवस्थापकाने पोलिसांना सांगितले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 7 सप्टेंबरला लोकशाही दिन

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला:** जिल्हास्तरीय लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिन जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात तिस-या माळ्यावरील बैठक कक्षात होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे, प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन तहसील स्तरावर होते.

## महागाई विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार महिला आघाडीचे आंदोलन

प्रतिनिधी ३ सप्टेंबर



**अकोला:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीने प्रदेशाध्यक्ष रोहिणीताई खडसे महिला यांच्या मार्गदर्शनात महागाई विरोधात व महाराष्ट्र केंद्र सरकारचा जाहीर निषेध करण्यासाठी विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले.

जिल्हा आणि महानगर महिलांचा आंदोलनात सहभाग होता. निवासी उपजिल्हाधिकारी मार्फत राज्य शासनाला विविध मागण्याची निवेदन सादर केले. न्यायासाठी हा लढा सुरूच असून शासनाने तातडीने सरकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशारा दिला. आंदोलनात महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

राकॉ महिला जिल्हाध्यक्ष मनीषा महल्ले, जिल्हाध्यक्ष सामाजिक न्याय विभाग कोकिळाताई वाहुरवाघ, सौ. छायाताई अब्रूक जिल्हा महासचिव, सौ. संगीताताई दाळु जिल्हा सरचिटणीस, योगिताताई सातपुते जिल्हा सचिव, सौ. राधाताई राऊत महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# डीजे-डॉल्बीच्या दणदणाटापासून सावधान....!

## लहान मुलांसह तरुण आणि ज्येष्ठांच्या आरोग्यावरही होऊ शकतो परिणाम

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला:** गणेशोत्सव असो किंवा अन्य सण-उत्सव... उत्साहाच्या भरात डीजे आणि डॉल्बीचा दणदणाट मोठ्या प्रमाणात वाढतो. मात्र या कर्णकर्कश आवाजाचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांच्या कानांवर होऊ शकतो. एवढंच नाही तर तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होण्याची शक्यता असते. याच पार्श्वभूमीवर अकोल्यातील (ईएनटी) तज्ज्ञ डॉ. सोनल मोदी यांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

सण-उत्सव म्हटलं की डीजे आणि डॉल्बीचा दणदणाट आलाच... मात्र याच मोठ्या आवाजामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. विशेषतः लहान मुलांच्या कानांवर मोठ्या आवाजाचा गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी लहान मुलांना डीजे, डॉल्बी किंवा मोठ्या आवाजाच्या ठिकाणी घेऊन जाणं शक्यतो टाळावं, असा सल्ला (ईएनटी) तज्ज्ञ डॉ. सोनल मोदी यांनी दिला आहे. जर काही कारणास्तव अशा ठिकाणी जाणं आवश्यक असेल, तर कानांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी कानात कॉटन किंवा योग्य प्रकारचे इअर प्रोटेक्शन वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मात्र शक्य असल्यास लहान मुलांना मोठ्या आवाजाच्या ठिकाणापासून दूर ठेवणे हाच अधिक सुरक्षित पर्याय असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.मोठ्या आवाजाचा परिणाम केवळ लहान मुलांपुरता मर्यादित नसून तरुणांनाही कानांमध्ये त्रास, आवाज ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम किंवा कानात सतत आवाज येण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. त्यामुळे तरुणांनीही डीजे आणि डॉल्बीच्या अगदी जवळ उभं राहणं टाळावं आणि शक्य तितकं अंतर ठेवावं.

तर ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

# रंगसंवाद’मधून अकोल्याच्या रंगभूमीचा समृद्ध वारसा उलगडला

प्रतिनिधी ३ सप्टेंबर




**अकोला:** प्रभात चॅरिटेबल सोसायटी अकोलाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी नारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विदर्भ साहित्य संघ, शाखा अकोला आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ‘रंगसंवाद’ या अभिनव कार्यक्रमात अकोल्यातील तब्बल १९ ज्येष्ठ रंगकर्मींनी विविध गाजलेल्या नाटकांतील ‘स्वगत’ सादर करून रसिकांना नाट्यविश्वाची अनोखी अनुभूती दिली. बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी प्रभात किड्स स्कूल, तोष्णीवाल ले-आउट ,अकोला येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सर्व सहभागी कलावंतांनी सामूहिक ‘नांदी’ सादर करून कार्यक्रमाला नाट्यमय प्रारंभ करून दिला.

‘रंगसंवाद’मध्ये ज्येष्ठ रंगकर्मी दिलीप देशपांडे यांनी 'मेड इन इंडिया', डॉ. रमेश थोरात यांनी 'आले आले शिवराय आले', विष्णू निंबाळकर यांनी 'तहान', डॉ. सुनील गजरे यांनी कापूस कोंड्याची गोष्ट, वंदना बाबर यांनी मी काहीही विसरलो नाही, विद्या बनाफर यांनी नटसम्राट, राजेश तराळे यांनी पाझर, डॉ. रावसाहेब काळे यांनी फाशी, विवेक वडशिंगीकर यांनी आरसा आणि मी, गीता जोशी यांनी उद्या नावाचा दिवस, राहुल भगत यांनी धुईधान, विनय बोदडे यांनी पुत्र कामेष्टी, श्रद्धा वरणकार यांनी शांतता! कोर्ट चालू आहे, अभय कुलट यांनी व्हिडिओ कॉलिंग, अमोल ताले यांनी लेखकाचा कुत्रा, अमृता जोशी-जटाळे यांनी ती फुलराणी, प्रमोद गोलडे यांनी नटसम्राट, भूषण सराग यांनी रायगडाला जेव्हा जाग येते... आणि सचिन पाटील यांनी अंधायुग या नाटकांतील स्वगतांचे प्रभावी सादरीकरण केले.

विदर्भ साहित्य संघ, शाखा अकोलाचे अध्यक्ष विजय कौसल यांनी, “नाट्यकला ही केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजाच्या भावविश्वाचे प्रतिबिंब दाखविणारी आणि माणसाला अंतर्मुख करणारी सशक्त कला आहे. ‘रंगसंवाद’मुळे अकोल्याच्या समृद्ध नाट्यपरंपरेला नव्या पिढीसमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले आहे,” असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक विदर्भ साहित्य संघ केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. गजानन नारे यांनी केले. संचालन प्रभात अकॅडेमिक एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक ॲड. वल्लभ नारे यांनी, तर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखेचे कार्यवाह अशोक ढेरे यांनी आभार मानले.

# गणेशोत्सवापर्यंत एनसीएमसी कार्डला मुदतवाढ

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोला :** एसटी महामंडळाच्या विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्डचा वापर १ सप्टेंबरपासून बस प्रवासात बंधनकारक करण्यात आला होता. मात्र, कार्ड वापरताना तांत्रिक अडचणी येत असल्याने लाभार्थी प्रवाशांना दिलासा देणारा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

एनसीएमसी कार्डच्या वापरासाठी आता १४ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. कारण अद्यापही अनेक महिला व जेष्ठ नागरिक यांनी एनसीएमसी कार्ड काढलेले नाही.एसटीच्या ज्येष्ठ नागरिक सवलत योजना, अमृत ज्येष्ठ नागरिक योजना आणि महिला सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांसाठी एनसीएमसी कार्डचा वापर सुरू करण्यात आला आहे.

मात्र, १ सप्टेंबरपासून कार्डचा वापर अनिवार्य केल्यानंतर पहिल्याच दिवशी प्रवाशांना कार्ड वापरताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे अनेक महिला आणि ज्येष्ठ नागरिक प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर एनसीएमसी कार्डच्या वापरासाठी अतिरिक्त मुदत वाढवून देण्यात आली आहे.

### एनसीएमसी कार्ड ची माहिती कोणालाही देऊ नये

अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून खासगी लिंक किंवा अनधिकृत ॲपवरून कार्ड टॉपअप करू नये. व्हॉटस ॲप अथवा सोशल मीडियावरून आलेल्या संशयास्पद लिंक किंवा क्यूआर कोडचा वापर टाळावा. कार्डची वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये. अनधिकृत दुकान किंवा व्यक्तीकडून टॉपअप करताना सावधगिरी बाळगावी.

### कसे कराल स्मार्ट कार्ड टॉपअप ?

एनसीएमसी कार्डमध्ये आवश्यक रक्कम उपलब्ध असणे गरजेचे आहे लाभार्थ्यांनी एसटीच्या अधिकृत यंत्रणेद्वारे कार्ड टॉपअप करून घ्यान वाहकाकडे ऑनलाइन पेमेंटद्वारे रक्कम अदा करून टॉपअप करता येईल. टॉपअप केल्यानंतर कार्ड मध्ये रक्कम जमा झाली आहे का, याची खात्री करावी. कार्ड हरवल्यास अथवा तांत्रिक अडचण आल्यास संबंधित एसटी आगाराशी संपर्क साधावा


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135